RNI No. - MAHMAR 2023/84526

विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१८ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

केंद्रीय कॅबिनेटकडून 'एक देश एक निवडणूक' प्रस्तावाला मान्यता, सूत्रांची माहिती

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ नवी दिल्ली

गेल्या अनेक दिवसांपासून देशभरात चर्चा असलेला 'एक देश, एक निवडणूक' धोरणबाबत केंद्र सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. मोदी सरकारच्या मंत्रिमंडळाने 'एक देश, एक निवडणूक' या धोरणाला मान्यता दिल्याची माहिती समोर आली. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली 'एक देश, एक निवडणूक' धोरण कितपत व्यवहार्य आहे, याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. या समितीने 'एक देश, एक निवडणूक' धोरणबाबत अनुकूल मत दर्शवत एक अहवाल सादर केला होता. या अहवालाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याचे समजते. यानंतर आता या धोरणाला संसदेत मंजुरी मिळणे आवश्यक आहे. मात्र, विरोधक याबाबत काय प्रतिक्रिया देणार, हे पाहावे लागेल. यावरुन तीव्र राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता आहे.

'वन नेशन, वन इलेक्शन'च्या मुद्द्यावरुन आधीपासूनच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतमतांतरं दिसून येत आहेत. अशातच 'वन नेशन, वन इलेक्शन'बाबत निर्णय घेण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने

अहवाल देण्यात आला होता. हा अहवाल रामनाथ कोविंद समितीने केंद्रीय कॅबिनेटसमोर ठेवला होता. या अहवालाला केंद्रीय कॅबिनेटकडून मान्यता मिळाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

निवडणूक आचारसंहितेमुळे लवकर निवडणुकीचा प्रस्ताव मांडला

महत्त्वाची बाब म्हणेज जेडीयू आणि लोक जनशक्ती पक्षानंच काही दिवसांपूर्वी या धोरणाला पुन्हा एकदा समर्थन दिलं होतं. निवडणूक जाहीर झाली की आचारसंहिता लागते, ज्यामध्ये कुठल्याही नव्या घोषणा करता येत नाहीत. यामुळे विकास खुंटतो असं केंद्र सरकारचं मत आहे. तसं होऊ नये म्हणून एक देश एक निवडणुकीचा प्रस्ताव मांडला गेला. त्या दृष्टीनं केंद्र सरकारनं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती देखील नेमली होती. या समितीनं प्रस्तावाच्या बाजूनं शिफारस केली होती, तसंच २०२९ साली एक देश एक निवडणूक घेता येईल असंही म्हटलं होतं.

महाराष्ट्रावर निर्णयाचा परिणाम होणार?

एक देश, एक निवडणूक' धोरणाची अंमलबजावणी झाल्यास देशात एकाचवेळी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका होतील. येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे 'एक देश, एक निवडणूक' धोरणाचा या निवडणुकीवर काही परिणाम होणार का, हे पाहावे लागेल. 'एक देश, एक निवडणूक' धोरणाला काँग्रेससह इंडिया आघाडीचा विरोध आहे. मात्र, पंतप्रधान मोदी आणि भाजप 'एक देश, एक निवडणूक' धोरणासाठी आग्रही आहे. या धोरणाची अंमलबजावणी झाल्यास दर काही महिन्यांनी वेगवेगळ्या राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका, त्यासाठी लागणारी निवडणूक यंत्रणा, आचारसंहितेच्या काळात रखडणारी कामे या सगळ्याला ब्रेक लागेल आणि प्रशासकीय यंत्रणा अधिक प्रभावीपणे काम करु शकेल, असे भाजपचे म्हणणे आहे. 'एक देश, एक निवडणूक' या धोरणाची अंमलबजावणी झाल्यास भारतीय राजकारणात आमुलाग्र बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी : बावनकुळे

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८नागपूर

आम्हाला अटक झाली तरी चालेल, मात्र राहुल गांधी यांच्या महाराष्ट्रात जिथे- जिथे सभा होतील त्या ठिकाणी त्यांनी आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा ओबीसी समाजासह अनुसूचित जाती जमाती समाजातील नागरिक त्यांचा निषेध करतील, असा इशारा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. राहुल गांधी यांनी आरक्षणाला विरोध केला आहे महाराष्ट्रात त्यांना त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्यासाठी प्रश्न विचारणार आहे. त्यांच्या पोटात होते ते ओठावर आले. काँग्रेसचा सुरुवातीलपासून आरक्षणाला विरोध आहे. मात्र लोकसभा निवडणुकीच्या काळात खोटा प्रचार करत मोदी सरकारची बदनामी केली आहे. आता जनता त्यांच्यावर विश्वास ठेवणार नाही. ओबीसी समाजाचे नेते म्हणविणारे नाना पटोले हे राहुल गांधींच्य वक्तव्यावरून माफी मागणार आहे का? . मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले पाहिजे, त्यांना राहुल गांधी यांचे वक्तव्य मान्य आहे का ? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याते काम केले जात आहे. आता ८६ हजर कोटी वर्षाला आदिवासी भागासाठी देत आहे. काँग्रेस आदिवासी काहीच मदत केली नाही. त्यांचा खोटारडेपणा समोर येईल., असे बावनकुळे म्हणाले

केंद्राकडून संवेदनशील सूचना, तीन मुख्य न्यायमूर्तींच्या नियुक्त्यांच्या शिफारशीमध्ये मोठा बदल

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सात उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी जुलैमध्ये नावांची शिफारस केली होती. या शिफारशीवर पुनर्विचार करून काही बदल करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने कॉलेजियमला काही नावांबद्दल संवेदनशील माहिती दिली होती. त्यानंतर तीन नियुक्त्यांमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे.

जुलै महिन्यात कॉलेजियमकडून सात नावांची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात आली होती. त्यानंतर सरकारकडून काही नावांबद्दल संवेदनशील माहिती देण्यात आली. केंद्राच्या सूचनेनंतर मंगळवारी कॉलेजियमने पहिल्या शिफारशीवर पुनर्विचार करत काही बदल केले.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती बीआर गवई सदस्य असलेल्या कॉलेजियमने शिफारशीमध्ये बदल केले आहेत. कॉलेजियमने न्यायमूर्ती सुरेश कुमार कैत यांच्या नावाची जम्मू काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी शिफारस केली होती. न्यायमूर्ती जी.एस. संधवालिया यांच्या नावाची मध्य प्रदेश उच्च न्यायालय आणि न्यायमूर्ती ताशी राबस्तान यांच्या नावाची मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी शिफारस करण्यात आली होती.

केंद्र सरकारने काही नावांबद्दल

संवेदनशील माहिती कॉलेजियमला दिली. त्यानंतर कॉलेजियमने शिफारशीवर पुनर्विचार केला आणि उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदासाठी सूचवण्यात आलेल्या नावात बदल केले. नव्या शिफारशीनुसार, जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी न्यायमूर्ती राबस्तान यांचे नाव पाठवण्यात आले आहे. न्यायमूर्ती कैत यांच्या नावाची मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी शिफारस करण्यात आली आहे. तर न्यायमूर्ती संधवालिया यांच्या नावाची हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदासाठी शिफारस करण्यात आली आहे. कॉलेजियमने न्यायमूर्ती इंद्र प्रसन्न मुखर्जी यांना मेघालय उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती करण्याची शिफारस केली आहे. न्यायमूर्ती मुखर्जी सध्या कोलकाता उच्च न्यायालयात न्यायमूर्ती आहेत.

२०१९ ला पैसे घेऊन विधानसभेची उमेदवारी, शिंदेंच्या आमदाराचा उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ मुंबई

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी तत्कालीन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पैसे घेऊन उमेदवारी देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवसेनेचे (शिंदे गट) वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांनी केला आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकतीच वैजापूरमध्ये जाहीर सभा घेतली. या सभेत त्यांनी शिवसेनेच्या शिंदे गटावर आणि स्थानिक आमदार रमेश बोरनारे यांच्यावर टीका केली होती. बोरनारे यांनी आज (१८ सप्टेंबर) वैजापुरात सभा घेऊन उद्धव ठाकरेंच्या टीकेला

उत्तर दिलं.

रमेश बोरनारे म्हणाले, २०१९ च्या निवडणुकीत वैजापूर विधानसभेची उमेदवारी देत असताना पैशाचा वापर होणार होता. पैसे घेऊन वैजापूरची उमेदवारी देण्याचा प्रयत्न केला गेला. एका माणसाला बळजबरीने पैशांच्या बदल्यात उमेदवारी दिली जाणार होती. उमेदवारी विकण्याचा घाट त्यांनी घातला होता आणि काल ते वैजापूरला येऊन माझ्यावर टीका करून गेले. ते म्हणाले, रमेश बोरनारेला उलटं टांगलं असतं. मात्र मी असं बोललो की आज जर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असते आणि त्यांनी तुम्हाला काँग्रेसबरोबर आघाडी करताना पाहिलं असतं तर त्यांनीच तुम्हाला उलटं टांगलं असतं.

आमदार बोरनारे म्हणाले, माजी मुख्यमंत्र्यांचा तोल ढासळला आहे. त्यामुळेच एका आमदारावर टीका करू लागले आहेत. ते त्यांना शोभत नाही. आम्हाला वाटलेलं वैजापूरला आल्यावर ठाकरे एखाद्या उमेदवाराच्या नावाची घोषणा करतील. पण ते आले आणि टीका करून गेले. मला फक्त एकच सांगायचं आहे की मागील निवडणुकीत मला सहज उमेदवारी मिळाली नाही. ते शेवटच्या क्षणी पैसे देणाऱ्याला तिकीट देणार होते. मात्र मी त्यांना भेटून सांगितलं की गेल्या २५ वर्षांपासून मी शिवसेनेसाठी किती काम केलं आहे. मी त्यांना आजवर केलेल्या कामांची माहिती दिली. मी त्यांना म्हटलं माझ्यासारख्या कार्यकर्त्याला तिकीट दिलं नाही तर शिवसैनिक आत्महत्या करतील.

एमआयडीसीमधील राम इंडस्ट्रिजला भीषण आग

६० पाण्याचे आणि ३५ रासायनिक फोमचे बंब वापरून २१ तासांनंतर आग आटोक्यात

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती

बडनेरा मिनी बायपास मार्गावरील एमआयडीसी परिसरात राम इंडस्ट्रिज या खाद्यतेल कंपनीच्या कारखान्याला बुधवारी सकाळी भीषण आग लागली. आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आल्यानंतर अमरावती महापालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी पोहोचले. अगिनशमन दलाच्या कर्मचाऱ्यांकडून आगीवर ताबा मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न करीत आग आटोक्यात आणली आगीमुळे आकाशात मोठे धुराचे लोट पाहायला मिळाले.

बडनेरा मार्गावरील जुन्या एमआयडीसीत राम इंडस्ट्रिज या कंपनीचा खाद्यतेल कारखाना आहे. या ठिकाणी शेंगदाणा आणि इतर तेलबियांचे गाळप गेले जाते. या कारखान्याला सकाळी ६ वाजताच्या सुमारास आग लागली. या कारखान्यात ज्वलनशील तेलाचा मोठा साठा असल्याने आगीने लगेच रौद्र रुप धारण केले. अग्निशमन दलाचे ६ बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत.

या कारखान्यात खाद्यतेलाचा साठा असल्याने आग पसरण्याचा धोका निर्माण झाला. सुरूवातीला एमआयडीसी परिसरातील वीज पुरवठा बंद करण्यात आला आणि

त्यानंतर उच्च दाबाच्या बंबांमधून पाणी फवारण्यात आले. सकाळची वेळ असल्याने कारखान्यात कर्मचारी पोहचलेले नव्हते. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचा शोध घेतला जात आहे. पोलीस, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी पोहचले असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले जात आहे. आतापर्यंत या घटनेत सुदैवाने जीवितहानीचे वृत्त नाही. ही आग लगतच्या भागात पसरू नये, याची दक्षता घेतली जात आहे. या आगीचा धूर दूरपर्यंत पोहचला होता. त्यामुळे अग्निशमन दलाच्या अडचणी वाढल्या.

याच एमआयडीसी परिसरात दोन वर्षांपुर्वी आनंद सागर कॉटन इंडस्ट्रीजमध्ये आग लागली होती. या आगीत सुमारे २९ लाख रुपयांचा कापूस जळून नुकसान झाले होते. त्याआधी २०२१ मध्ये नॅशनल पेस्टिसाईड्स अ‍ॅन्ड केमिकल या कारखान्याला भीषण आग लागून यंत्रसामग्री, खते आणि रसायनांचा साठा जळून खाक झाला होता. ही भीषण आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाला तब्बल २१ तास प्रयत्न करावे लागले होते. महापालिकेचे अग्निशमन दलाचे बंब कमी पडल्याने चांदूर रेल्वे, चांदूर बाजार, अचलपूर, बडनेरा येथून अग्निशमन वाहने मागविण्यात आली होती. ६० पाण्याचे आणि ३५ रासायनिक फोमचे बंब वापरून २१ तासांनंतर ही आग आटोक्यात आली होती. राम इंडस्ट्रिजला बुधवारी लागलेल्या आगीने या घटनांच्या आठवणी जाग्या झाल्या आहेत.

मुंबईत तब्बल ३७,२०८ गणेश मूर्तींचं विसर्जन; पुढच्या वर्षी लवकर या!

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई

मुंबईतीलगणेश विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडला. अनंत चतुदर्शी दिवशी सुरु झालेला विसर्जन मिरवणुकीचा सोहळा अगदी आज सकाळी साडेदहा वाजेपर्यंत सुरू होता. मनपाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार आज दुपारी १२ वाजेपर्यंत एकूण ३७,२०८ गणेश मूर्तींचं विसर्जन झालं आहे.

गिरगावच्या चौपाटीवर सकाळी साडेदहा वाजेपर्यंत विसर्जन सुरू होतं. सुप्रसिद्ध लालबागच्या राजाची मिरवणूक सकाळी साडेआठच्या सुमारात चौपाटीवर दाखल झाली होती. दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर मुंबईकरांनी साश्रू नयनांनी बाप्पाला निरोप दिला. चौपाट्यांसोबतच मुंबईत गिरगाव, दादर, जुहू, मार्वे आणि अक्सा इथे कृत्रिम तलावांचीही व्यवस्था करण्यात आली होती.

गिरगावच्या चौपाटीवर सकाळी साडेदहा वाजेपर्यंत विसर्जन सुरू होतं. सुप्रसिद्ध लालबागच्या राजाची मिरवणूक सकाळी साडेआठच्या सुमारात चौपाटीवर दाखल झाली होती. दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर मुंबईकरांनी साश्रू नयनांनी बाप्पाला निरोप दिला. चौपाट्यांसोबतच मुंबईत गिरगाव, दादर, जुहू, मार्वे आणि अक्सा इथे कृत्रिम तलावांचीही व्यवस्था करण्यात आली होती.

बुधवारी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार ३७,०६४ गणेश मूर्तींचं विसर्जन झालं. यात ५७५२ सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश मूर्तींचा समावेश आहे. तर ३१,१०५ घरगुती गणपतींचा समावेश आहे, असं एका मनपा अधिकाऱ्यानं सांगितलं.

दरम्यान, यंदाच्या विसर्जनामध्ये एकूण ११,४१९ गणपती मूर्तींचं कृत्रिम तलावामध्ये विसर्जन झालं आहे. हा आकडा एकूण मूर्तींच्या ३० टक्के इतका आहे. गेल्या वर्षी हे प्रमाण ३७ टक्के इतकं नोंदवलं गेलं होतं. विसर्जन सामान्यत: अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवसापर्यंत चालू असते. २०२० ते २०२२ दरम्यान तीन वर्षांसाठी कोविडमुळा सार्वजनिक मंडळांची संख्या तात्पुरती कमी झाली होती. त्यामुळे त्या काळात झालेल्या सार्वजनिक विसर्जनांची संख्या तुलनेने कमी होती, अशी माहिती बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे (बीएसजीएसएस) अध्यक्ष नरेश दहिभावकर यांनी दिली.

संपादकीय ......

पंतप्रधान नरेंद्र मोदी : विकसित भारताचे प्रणेते

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात जवळपास ७० देशांना भेटी दिल्या. त्यातून जागतिक राजकारणाला दिशादर्शन करणारा देश म्हणून भारत पुढे आला आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक, पर्यावरणीय, तंत्रज्ञानविषयक वैश्विक समस्यांमध्ये भारताला डावलून चालणार नाही, उलट भारत या प्रश्नांच्या, समस्यांच्या सोडवणुकीसाठी अत्यंत मोलाची मदत करू शकतो, त्यांचे निराकरण करू शकतो ही बाब भारताने सिद्ध करून दाखवली आहे. आज (दि. १७ सप्टेंबर) त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्ताने...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा तिसरा कार्यकाल सुरू होऊन शंभर दिवस झाले आहेत. मोदी सरकारचा संपूर्ण कार्यकाळ भारताच्या जागतिक प्रभावाचा व एकूणच आर्थिक विकासाचा म्हणून ओळखला जात आहे. याच कार्यकाळात भारताने इंग्लंडला मागे टाकत पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून झेप घेतली व आता जपान व जर्मनीला मागे टाकून तिसर्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल सुरू आहे. भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरच्या दिशेने जात आहे. याच कार्यकाळात स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली असून, आता शंभरीच्या दिशेने जाताना भारताने विकसनशील देशाकडून विकसित देश बनण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी आगामी २५ वर्षांसाठीच्या योजनांची आखणीही केली आहे. या योजनांत प्रामुख्याने भारताच्या अर्थव्यवस्थेला १० ट्रिलियन डॉलरपर्यंत घेऊन जाताना हा आर्थिक विकास लोकसहभागातून घडवून आणण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया, नमामि गंगे, क्लीन इंडिया, डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले आहेत. या सर्वांच्या माध्यमातून भारताला जागतिक उत्पादनाचे केंद्र म्हणजेच 'मॅन्युफॅक्चरिंग हब' आणि निर्यात केंद्र म्हणजेच 'एक्स्पोर्ट डेस्टिनेशन बनू शकेल, अशा दृष्टिकोनातून प्रयत्न सुरू आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात जवळपास ७० देशांना भेटी दिल्या. सर्वाधिक परदेश दौरे करणारे ते भारतातील पहिले पंतप्रधान आहेत. बदललेल्या भारताची ओळख जगाला करून देणे, भारताची 'ग्रोथ स्टोरी' मांडून ब्रँडिंग करणे आणि जगभरातील भांडवल व तंत्रज्ञान भारतात आणणे या दृष्टिकोनातून या सर्व दौर्यांची आखणी करण्यात आली. या सर्वामधून भारत हा केवळ दक्षिण आशियापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर जागतिक सत्ता बनलेला आहे, हे भारताने दाखवून दिले आहे. आर्थिक, राजकीय, सामाजिक, पर्यावरणीय, तंत्रज्ञानविषयक वैश्विक समस्यांमध्ये भारताला डावलून चालणार नाही, उलट भारत या प्रश्नांच्या, समस्यांच्या सोडवणुकीसाठी अत्यंत मोलाची मदत करू शकतो, त्यांचे निराकरण करू शकतो, ही बाब भारताने सिद्ध करून दाखवली आहे.

भारताने मोठ्या देशांसोबत सकारात्मक भागीदारी करण्याचे धोरण स्वीकारले आहे. आज जगभरातील जी-२०, ब्रिक्स, क्वाड, शांघाय सहकार्य संघटना यांसारख्या सर्व प्रमुख बहुराष्ट्रीय संघटनांचा भारत सदस्य बनला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये जी-२० च्या वार्षिक शिखर संमेलनाचे यशस्वी आयोजन भारताने केले व या बैठकीतील घोषणापत्रावर-ठरावावर दुर्मीळ वाटणारी सर्व सदस्यांची सामूहिक सहमती घडवून आणली. जी-२० च्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून भारताने आपल्या डिजिटल परिवर्तनाची ओळख करून दिली. भारताने विकसित केलेले कोविन ॲप, फास्ट ट्रॅक सिस्टीम, आधार कार्ड, यूपीआय यांचे अनुकरण आता अन्य देश करू लागले आहेत. विकसनशील व गरीब राष्ट्रे त्यांच्या देशाचा कायापालट कसा घडवून आणू शकतात, याचे एक प्रतिमान किंवा मॉडेल भारताने विकसित केले आहे.

जी-२० ला भारताने लोकचळवळीचे रूप दिले. 'इनक्लुझिव्ह ग्रोथ' किंवा सर्वसमावेशक विकास, सर्वांना एकत्र घेऊन चालणे ही भूमिका भारताने पुढे आणली. भारताचे अध्यक्षपद हे सामाजिक समानतेच्या न्यायावर आधारित होते. आफ्रिकन युनियनला जी-२० चे सदस्यत्व मिळवून देणे हा भारताचा मास्टरस्ट्रोक ठरला. म्हणूनच भारताकडे जी-२० च्या अध्यक्षपदाला 'पीपल्स प्रेसिडन्सी' म्हणजेच लोकसहभागातून अध्यक्षपद साजरे करणे असे म्हटले गेले.

काही महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केले होते. आतापर्यंत आंतरराष्ट्रीय संस्था-संघटनांचा अजेंडा हा पश्चिमी विकसित देश निर्धारित करत होते. त्याचे अनुपालन इतर विकसनशील देशांना करावे लागत होते. आता परिस्थिती बदलली आहे. अशा संस्था-संघटनांचा अजेंडा भारत ठरवू लागला असून, त्याचे अनुपालन श्रीमंत आणि विकसित देश करणार आहेत. आजवर भारत दीर्घकालीन धोरणांची आखणी करत नव्हता; पण आता अमेरिका, चीनप्रमाणे भारताने पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा निश्चित केला आहे. या २५ वर्षांत विकसित देश बनण्याबरोबरच जगाचे नेतृत्व करणारा देश म्हणून भारत पुढे येणार आहे. विकसित भारताचे प्रणेते, उद्गाते म्हणून पंतप्रधान मोदींचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

पंतप्रधान मोदी यांना विविध देशांनी अत्यंत सन्मानाच्या पुरस्कारांनी गौरविले आहे. यात काही देशांच्या सर्वोच्च नागरी सन्मानांचा समावेश आहे. तसेच संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरण रक्षणासाठीचा सर्वोच्च पुरस्कार, दक्षिण कोरियाचा शांततेसाठीचा पुरस्कार त्यांना दिला आहे. या पुरस्कारांतील एक अत्यंत उल्लेखनीय बाब म्हणजे मोदी यांना ज्या देशांनी सर्वोच्च नागरी सन्मान दिलेले आहेत, त्यातील चार इस्लामिक देश आहेत. सौदी अरेबियाने किंग अब्दुल्लाअजीज साश पुरस्कार, अफगाणिस्तानने अमिर अब्दुल्ला खान पुरस्कार, संयुक्त अरब आमिरातीने झायेद मेडल व पॅलेस्टाईनने ग्रँड कॉलर ऑफ दी स्टेट या सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी गौरविले आहे.

पितृपक्षात फुलांचा भाव स्थिरावणार असून दसऱ्याला फुलांचे भाव पुन्हा कडाडतील

दि.१८विदर्भ प्रजासत्ताक - स्थिरावलेला झेंडूचा दर यंदा गणेश उत्सवामुळे तेजीत होता. पावसामुळे बहुतांशी फुलांची नासाडी झाली होती. त्यामुळे बाजारात फुलांची आवकही कमी होती.

गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला मात्र फुलांच्या भावात घसरण झाली. आता पितृपक्षात फुलांचा भाव स्थिरावणार असून, दसऱ्याला फुलांचे भाव पुन्हा कडाडतील, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला.

स्थिरावलेला झेंडूचा दर यंदा ७० ते ८० रुपये किलो इतका शेताच्या बांधावर झाला आहे. इतर फुलांच्याही बाजारभावात वाढ झाली आहे. गेले दोन महिने झालेल्या मुसळधार पावसाचा फटका फूलशेतीला बसला आहे.

अनेक ठिकाणी फूलशेती कोलमडली आहे. उत्पादनापेक्षा मागणी जास्त आहे. त्यामुळे फुलांना चांगले बाजारभाव मिळत आहे.

अमरावती तालुक्यांत अनेक शेतकरी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत झेंडू, अस्टर, गुलछडी, जास्वंद, पांढरी शेवंती आदी फुलांचे भरघोस उत्पादन घेतात. मात्र, यावर्षी अनेक गावांत सतत झालेल्या मुसळधार पावसामुळे फुलांची रोपे व झाडे वाया गेली.परिणामतः मोठ्या प्रमाणात मागणी असूनही फुलांचा पुरवठा करता येत नाही, असे अकोळनेर (ता. नगर) येथील फूल उत्पादक शेतकरी तुषार मेहेत्रे यांनी सांगितले. पितृ पंधरवाड्यात झेंडूचे प्रति किलो भाव ३० ते ४० रुपये राहतील. मात्र, नवरात्रीत व दसरा, दिवाळीत फुलांच्या भावात पुन्हा वाढ होईल, असे व्यापारी सांगतात.

फुलांचे दर असे (रुपये/किलो)

झेंडू - ३०
शेवंती - ८०
गुलाब - २००
गुलछडी - १६०

पोषक आहारासाठी कोणत्या रानभाज्या वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक

भारतात विविध स्थानिक रानभाज्या मुबलक प्रमाणात आढळून येतात. अनेक रोगांपासून लढण्याची नैसर्गिक शक्ती त्यातून मिळते. त्यापैकी काही वनस्पतींना आपण रानभाज्या म्हणून ओळखतो.

या वनस्पतींमध्ये मानवी शरीरासाठी अत्यावश्यक खनिजे, महत्त्वाची मूलद्रव्ये व अत्यंत उपयोगी रसायने असे अनेक मानवी आरोग्यास पोषक घटक व औषधी गुणधर्मही यात मोठ्या प्रमाणात आढळतात.

फोडशी, अंबूशी, कुरडू, टाकळा, चिवळा, मटारू, फाश्या, फांगळा, पाथरी, शेवूल, तरोटा, लोथ, उळशी, वाघाटी, सफेद मुसळी, रानकेळी, कुरडू, तेरा, केना, माठ, चाई, कुळा, घोळ, कोहरूळचा पाला, भारंगीचा पाला या रानभाज्या, तसेच कटुले, मोहाची फळे, अळीव, भोकरीचे फळे, तोरण, करवंद टेंभुर्णी, गोमटी, वाघाटी ही रानफळे पाहायला मिळतात. ऋतुमानानुसार शिरीचे दोडे, तागाड्याची फुले, बहाव्याची फुले, मोहाची फुले, कुडाची फुले, चाईचा मोहर, उलशीचा मोहर अशी अनेक फुले उपलब्ध होतात.

रानभाज्या आणि औषधी गुणधर्म

१) करटोली

काही भागांमध्ये या वनस्पतीचे नाव वेगळे असू शकते. याचे शास्त्रीय नाव 'भौमोर्डिया डायोका' है असून, ही वनस्पती शरीरासाठी अतिशय पोषक असून, तंतुमय घटक असलेली ही वनस्पती प्रथिनांचा आणि लोहाचा उत्तम स्रोत आहे. उष्मांक मूल्य अतिशय कमी असल्यामुळे मधुमेहींसाठीसुद्धा ही वनस्पती उपयुक्त आहे. यातील तंतुमय घटक आणि प्रतिऑक्सिडीकारकांमुळे पचनक्रियेस चालना देते.

२) चिवळ- या वनस्पतीचे शास्त्रीय नाव 'पोर्चुलेंका कार्डीफीडा' हे असून, यात ९० ते ९३ टक्के पाण्याचे प्रमाण व कमी उष्मांक मूल्य असलेल्या या भाजीमध्ये ओमेगा-३ मेदाम्ले आहेत, तसेच यात मुबलक तंतुमय पदार्थ, जीवनसत्त्व अ, ब, क या जीवनसत्त्वबरोबरच पचनक्रियेत उपयुक्त ठरणारी लोह, पोटॅशियम, कॅल्शिअम, मॅग्नेशियम ही खनिजे असतात.

रानभाज्यांची रेलचेल

३) घोळची भाजी

या वनस्पतीचे शास्त्रीय नाव 'पोर्चुलँका ओलिरेंसिया' हे असून, महाराष्ट्रात ही भाजी घोळची भाजी याच नावाने प्रसिद्ध आहे. घोळच्या भाजीमध्ये अनेक पोषक घटक, तंतुमय पदार्थ जीवनसत्त्व आणि खनिजे मुबलक प्रमाणात असतात, तसेच या भाजीत कमी उष्मांक मूल्ययुक्त व कोलेस्टेरॉलचे प्रमाण शून्य टक्के असते. या भाजीमध्ये अ, क ही जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असून, ही भाजी अन्नपचनास मदत करते, यकृताचे कार्यही सुधारते, वैद्यकीय तज्ज्ञांच्या मतानुसार घोळच्या भाजीत ऑक्सालिक ॲसिडचे प्रमाण जास्त असल्यामुळे मूतखड्याचा त्रास असलेल्या व्यक्तींनी ही भाजी खाऊ नये.

४) टाकळाची भाजी

तण म्हणून शेताच्या बांधावर पावसाळ्यात उगवणाऱ्या या वनस्पतीचे शास्त्रीय नाव 'कॅसिया टोरा' असे असून, टाकळ्याच्या भाजीत चांगल्या प्रमाणात तंतुमय घटक, बीटा कॅरेटीन, जीवनसत्त्व बी १, बी २, क आणि कॅल्शियम, लोह, झिंक या खनिजांसोबत मुबलक प्रमाणात फायटोकेमिकल्स असतात. या भाजीतील विरेचन द्रव्य रक्तवाढीस पोषक आहे. या भाजीच्या नियमित सेवनाने शरीरातील वात व कफदोष कमी होण्यास मदत होते.

५) अंबाडीची भाजी

या भाजीचे शास्त्रीय नाव 'हिबिस्कस सॅबडॅरिफा' हे असून, अंबाडीच्या भाजीत कैल्शियम, फॉस्फरस, लोह, झिंक, जीवनसत्त्व अ आणि क अशा पोषकघटकांसह खनिजांचा उत्तम स्रोत म्हणून ही भाजी ओळखली जाते. अंबाडीच्या लाल फुलांतही (बोंड्यामध्ये) पोषक घटक मुबलक असून, त्याची चटणी बनवली जाते.

भारंगीची भाजी

या रानभाजीचे शास्त्रीय नाव 'क्लेरोडेंड्रम सेरेंटम' हे असून ही भाजी श्वसनक्रिया उत्तम राहावी आणि दमा होऊ नये, यासाठी कोकणात भारंगीच्या पानांची भाजी खाल्ली जाते. भारंगीच्या कोवळ्या पानांची भाजी चवीला रुचकर होत असून, ही भाजी सर्दी, खोकला, ताप, छाती भरणे या विकारांत अत्यंत लाभदायक ठरत असते. भारंगीची मुळे, फुले यांनासुद्धा आयुर्वेदात खूप महत्त्व आहे.

कुंडीत रानभाजी?

आता समाजमाध्यमांमुळे फोडशी, कुई, तांदुळजा, माठ, चिवळ, भारंगी, केना या भाज्या आपण ओळखू लागलोय; पण काही भाज्या या अगदीच काही दिवसांसाठी मिळतात. या भाज्या बाजारातून विकत घेता येतीलच, पण आपल्या परस बागेत किंवा आपल्याकडील उपलब्ध जागेत जर या भाज्या लावल्या, तर आपल्याला ताज्या भाज्या घरीच मिळतील. आपल्याच घरच्या कुंडीत, परसदारी हा अमूल्य ठेवा आपल्याला आपल्या स्वतःच्या थोड्याशा मेहनतीत उपलब्ध होऊ शकतो.

प्रा. अदिती सुनील काळे
वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख, अभ्यासक, मालेगाव

आरोग्य संपदा
आहार

मोबाईलशिवाय जगणे झाले अशक्य; तरुण होताहेत नोमोफोबियाचे शिकार

दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक

तरुणांमध्ये मोबाईलविषयी आकर्षण वाढत चालले आहे. मोबाईलशिवाय जगणे बऱ्याच जणांना अशक्य बनत चालले आहे. त्यामुळे नोमोफोबियाची लक्षणे असलेल्या रुणांमध्ये वाढ होत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञ डॉक्टरांनी नोंदवले आहे.तरुणांमध्ये नोमोफोबियाचे १० ते १५ टक्के रुग्ण आढळले असून ते वैद्यकीय सल्ल्यासाठी संपर्कात असल्याची माहिती मानसोपचार तज्ज्ञांनी दैनिक पुढारी प्रतिनिधीशी बोलताना दिली. काही संशोधनांमध्ये असे दिसून आले आहे की, कॉलेजमधील युवा व युवतींमध्ये नोमोफोबियाच्या लक्षणांचे प्रमाण १० ते १५ टक्के इतके आहे. लहान मुलांमध्ये हे प्रमाण जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोमोफोबिया म्हणजे काय? नोमोफोबिया म्हणजे नो मोबाईल फोन फोबिया. मोबाइल किंवा इंटरनेटची उपलब्धता नसेल तर काय होईल, अशी अनाठायी भीती अशा रुणांना वाटते.

नोमोफोबियाची कारणे- महत्त्वाची माहिती, सामाजिक संवाद किंवा संधी गमावण्याची भीती व्यक्तींना त्यांचे फोन सतत तपासण्यास प्रवृत्त करते. मोबाइल डिव्हाइसवरून डिस्कनेक्ट होण्याची भीती चिंता विकार किंवा तणाव वाढवू शकतात.

नोमोफोबियाची प्राथमिक लक्षणे

मोबाईलचा अतिवापर, मोबाइलजवळ नसेल तर भयगंड निर्माण होणे, उदासीनता, अस्वस्थता, निद्रानाश ही प्रमुख लक्षणे जाणवतात. लहान मुलांमध्ये हट्टीपणा, चिडचिडेपणा दिसतो.

शारीरिक लक्षणे : जेव्हा फोन वापरता येत नाही तेव्हा घाम येणे, थरथर कापणे, वेगवान हृदयाचे ठोके किंवा मळमळ होणे.

नोमोफोबियाची तपासणी महापालिकेच्या वायसीएम रुणालयात नोमोफोबिया या मानसिक आजाराने ग्रस्त रुण येतात. अद्यापही या आजाराबाबत लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव पाहण्यास मिळतो. लहान मुलांना उपचार घेण्यासाठी पालक फार उशिरा येतात असे दिसून येते. अभ्यासावर परिणाम दिसू लागल्यावर पालक विषय गांभीयनि घेतात, अशी माहिती मानसोपचार तज्ञ डॉ. गौरव वडगांवकर यांनी दिली.

काय काळजी घ्याल?

स्क्रीन टाइम मर्यादित करा.

फोन वापरावर सीमा सेट करा.

संदेश आणि सोशल मीडिया तपासण्यासाठी विशिष्ट वेळ द्यावा.

परस्परसंवादाला चालना द्यावी.

मोबाइलचा वापर कमीत कमी करणे गरजेचे आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लहान मुलांना मोबाइल न देणे होय.

नोमोफोबियाची लक्षणे आढळल्यास त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, सोशल मीडियाचा वापर पूर्णपणे बंद करायला हवा. मोबाइल फक्त महत्त्वाच्या कामासाठी वापरावा.

आर्टीफिशीयल टँक व कृत्रिम तलावातील विसर्जनात महानगरपालिका अग्रेसर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अमरावती

मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर,२०२४ रोजी अनंत चतुर्थीचे दिवशी नागरीकांच्या अडचणी लक्षात घेवून अमरावती महानगरपालिकेने श्री. गणेश विसर्जनासाठी अभियंता भवन, शेगाव नाका, सहकार नगर, ग्राऊंड, फार्मसी शासकीय विद्यालय, कठोरा नाका, आराधना बिल्डींग रिंग रोड, चाणक्य हॉटेल, नागपुर रोड, शिवाजी कमर्शियल मार्केट, रवि नगर चौक, नेहरु मैदान, प्रशांत नगर बगिचा, मालटेकडी जवळ, प्रथमेश तलाव वडाळी, छत्रीतलाव, विद्यापीठ चौक, पुलाजवळ, मोती नगर, बगीचा, साईनगर, साईमंदीर जवळ, बडनेरा, झिरी तलाव, गोपाल नगर, जीम जवळ, बडनेरा, बारीपुरा, रवी नगर, महाजनपुरा हनुमान नगर, बुधवारा या ठिकाणी नागरीकांना आर्टीफिशीयल टँकची सुविधा उपलब्ध करुन दिलेली होती.

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने श्री. गणेश विसर्जनाकरीता नागरीकांच्या सोयीसाठी आर्टीफिशीयल टँक ठेवण्यात आले होते. प्रत्येक ठिकाणी अमरावती महानगरपालिकेने नियंत्रण अधिकारी नेमून तेथील सर्व जबाबदारी त्यांचेवर सोपविली होती. नागरीकांनी आपल्या घरातील श्री.गणेश विसर्जन नेमून दिलेल्या जवळच्या आर्टीफिशीयल टँकमध्येच विसर्जन केले. या प्रक्रीयेमुळे पर्यावरणाचा समतोल साधणेस व स्वच्छता मोहीमेस नागरीकांचा हातभार लागला.

महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आर्टीफिशीयल टँक व कृत्रिम तलावात मूर्तीचे विसर्जन करण्याच्या आवाहनाला गणेश भक्तांनी प्रतिसाद दिला.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक
बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४
शहर/ग्रामिण

सोशल मीडियामुळे व्यक्तीची स्वतः ची ओळख गोंधळात टाकणारी – शुभांगी जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ अमरावती

नशीब वगैरे काही नसतं एकदा का स्वतःची ओळख झाली की मग आपल्यात असलेले गुण कळतात . आपल्याला नेमकं काय करायला पाहिजे ही भूमिका स्पस्ट होते आणि यातूनच यशाचा मार्ग स्पस्ट दिसू लागतो . स्व–ओळख म्हणजे प्रत्येक व्यक्तीची स्वतःबद्दल असलेली समज, स्वतःचा दृष्टिकोन आणि आपल्याबद्दलची जागरूकता. यामध्ये आपले विचार, भावना, आवडीनिवडी, मूल्ये, ध्येय, आणि आपल्याबद्दलच्या इतरांच्या धारणा यांचा समावेश असतो. स्व–ओळख म्हणजेच आपण कोण आहोत याचे उत्तर शोधण्याची प्रक्रिया. पुढे सोशल मीडिया चा आपल्या व्यक्तिमत्वावर कसा प्रभाव होतो हे सांगताना त्या म्हणाल्या आजच्या डिजिटल युगात, सोशल मीडियामुळे व्यक्तीची स्वतः ची ओळख कधीकधी गोंधळात टाकणारी असते. लोकांच्या प्रतिक्रियांमुळे आपण आपले स्वरूप बदलू लागतो,असे मत दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या संपादिका शुभांगी जोशी यांनी बोलतांना व्यक्त केले. शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावतीच्या तत्त्वज्ञान विभागाद्वारे तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाच्या कार्यकरणीचे उद्घाटन कार्यक्रम शनिवार दि.१४ रोजी आयोजित करण्यात होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि वक्ते शुभांगी जोशी यांनी Who am I या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. कुवरलाल वासनिक होते.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शुभांगी जोशी पुढे म्हणाल्या की,जे आपल्यासाठी नेहमी सकारात्मक असतेच असे नाही. स्व–ओळख ही एक सतत बदलणारी प्रक्रिया आहे, कारण आपल्या जीवनातील अनुभव, शिकवण, आणि संधींमुळे आपली ओळख सतत विकसित होत राहते.स्वामी विवेकानंद, अब्दुल कलाम, आणि सिंधुताई सपकाळ यांसारख्या महान व्यक्तींनी त्यांच्या स्व–जागरूकतेच्या आधारे जीवनात मोठे परिवर्तन घडवले आणि समाजासाठी प्रेरणास्थान ठरले. या सर्व व्यक्तींनी साधारण कुटुंबातून येऊनही त्यांच्या आतल्या सामर्थ्याची जाणीव केली, आणि त्याच आधारावर त्यांनी महान कार्य केले.उठा, जागे व्हा, आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका विवेकानंदानी सम्पूर्ण जगाला हा संदेश दिला.यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणातून तत्त्वज्ञानाच्या महत्त्वावर आणि विद्यार्थ्यांनी तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे आकर्षित होण्याच्या गरजेवर भर देण्याच मत प्रा.डॉ. कुवरलाल वासनिक यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाची प्रस्तावना प्रभारी प्राध्यापक उदयकुमार टेंभरे यांनी सादर केली. त्यांनी तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाचे उद्दिष्टे व महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाच्या नव्या कार्यकारिणी आणि सदस्यांचा सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाची नवी कार्यकारिणी खालीलप्रमाणे

अध्यक्ष: आशिष मेश्राम (M- 2), उपाध्यक्ष: प्रणव पाथरे (M- 1), सचिव: प्राची भागवत (B- 3), सह सचिव: कनिष्क खंडारे (१२वी), कोषाध्यक्ष: आशिष भोंडे (B- 3), सह–कोषाध्यक्ष: शिवम युवनाते, तसेच, सदस्यांमध्ये क्षिती जोग, गौरी सगने (B- 1), इशांत चांदूरकर, विनय तायडे (B- 1), सेजल बारद्दे (B- 1), आणि वेदांत जयसवाल यांचा समावेश आहे.

शिक्षकांचे आज पासुन असहकार आंदोलन

अमरावती जिल्हात उत्स्फूर्त प्रतिसाद

जि.प.उच्च प्राथ.शाळा कोहाना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अमरावती – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबाबत शासनाने घेतलेले घातक निर्णय आणि शाळा, शिक्षण ,विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने आज पासून शिक्षकांनी काळी फीत लावून कामकाज सुरु आहे.आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात अमरावती जिल्हात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.असे सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या वतीने कळविले आहेमंगळवार पासून सुरू झालेल्या काळी फीत आंदोलनात आणि आज पासून व्हाट्सअप ग्रुप मधून बाहेर पडण्याच्या आंदोलनात आपला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा. तसेच २५ सप्टेंबरला होणाऱ्या आक्रोश महामोर्चात सामील होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, शिक्षण, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संबंधाने शासनाच्या धोरणास प्रखर विरोध करावा अशी कळकळीची विनंती राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांनी एकत्र येत आंदोलनाची दिशा निश्चित केली आहे. सर्व संघटनांच्यावज्रमुठीला अधिक बळकट करूया.असे आवाहन अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीने केले आहे.अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवार २५ सप्टेंबरला दुपारी १२ वाजता एस टी डेपो पासुन महामोर्चा काढण्यात येणार आहे.जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी २५ सप्टेंबर रोजी सामुहिक रजा घेऊन आंदोलनात सहभागी व्हावे असे सर्व शिक्षक संघटना जिल्हा समन्वय समिती अमरावती यांनी केले आहे.

पशुवैद्यकीय पथकाने गाईला दिले जिवनदान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अंजनगाव सुर्जी–

अंजनगाव सुर्जी पंचायत समीती परिसरात एका अवघडलेल्या गायीवर पंचायतसमीच्या आवारातच पशुचिकीत्सकांनी तब्बल तीन ते चारा तास कठिण शस्त्रक्रिया करुन त्या गायीला वाचवले मात्र गायीच्या पोटात असलेले वासरु डॉंक्टर वाचवू शकले नाही .हि शस्त्रक्रिया शेकडो लोकांनी उघडच्या डोळ्यांनी बघीतली आणि डॉंक्टरांना देव का म्हणतात.याची प्रचिती आली.पंचायत समीतीचे कार्यालयाच्या आवारात बेवारस गाय अवघडलेल्या परीस्थीतीत प्रकृती अस्वस्थ झाल्यामुळे एक गाय सकाळपासूनच तडफडत होती. गायीला असह्य वेदना होत असल्याचे लक्षात येताच पंचायत समीतीत असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना व पशुचिकीस्तकांना कळवण्यात आले पशुधन विकास अधीकारी डॉ.श्याम टाले पशुधन पर्यवेक्षक डॉ. राजेश गाडगे,डॉ.जितेंद्र निचळ, डॉ.निलेश इंगळे ,डॉ.नागसेन अभ्यंकर ,डा.दीपमाला मेसरे यांनी कशाचीही वाट न पहाता लगेच पंचायत समीतीत धाव घेतली. व गणेश नगर येथील काही सहकारी पशुमीत्र प्रवीण उर्फ पींटू कोल्हे,मनीष चर्हाटे,निलेश मानकर,उमेश चौखंडे , सुंदर कोल्हे, तुषार रोंघे यांनीही पंचायत समीती आवार गाठले. गायीचे पोटातुन पाय बाहेर असलेले मृत व असलेले पिल्लु दीसुन आल्यावर पशु चिकीस्तकांनी सकाळी दहा वाजता पासुन दुपारचे दोन वाजेपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा करत मृत वासरु बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. परंतु ते पोटातच फुगल्याने पशुचिकीस्तकांना काढण्यास अपयश आल्यानंतर सर्व डॉक्टरांनी गाईच्या वेदना समजून घेतल्यावर सिझर ची शस्त्रक्रिया करुण मृत झालेले पीलु काढण्याचा निर्णय घेतला.,तीन वाजता शस्त्रक्रिया पार पाडत गाईच्या पोटातुन तब्बल २२ किलोहुन अधिक वजनाची मृत आवस्थेत असले वासरु शस्त्रक्रीया करुन बाहेर काढुन गाईचा जीव वाचवला. म्हणतातना देव तारी त्याला कोण मारी या उक्तीने पशुवैद्यकीय अधिकारी गाईसाठी देव बनून आले. .सार्वजनिक ठीकानावर गायीवर होत असलेल्या शस्त्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव उपस्थितांनी यांची देही याची डोळा बघितला.या सर्व घाडामोडीत गटविकास अधिकारी विनोद खेडकर व ता. वैद्यकीय अधिकारी सुधीर डोंगरे तालुक्यातील पत्रकार अशोक पिंजरकर, रविद्र वानखडे, प्रविन बोके ,उमेश काकड,गजेंद्र मंडलीक,सचीन अब्रुक,मनोज मेळे ईत्यादींचे सहकार्याने गायीला जिवदान मिळाले असुन घरच्या गणपती विसर्जना ची चिंता सोडुन दिवसभर गायीचे जिव वाचवीण्यास धडपड करणारें पशुचिकीस्तकां चे व सहकारी पशुमीत्रांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दादांनी थांबवलं तरी भाजपाविरोधात निवडणूक लढणार

अजित पवार गटातील नेत्याचा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ नागपूर – नागपूर पूर्व मतदारसंघात राष्ट्रवादादांनी थांबवलं तरी भाजपाविरोधात निवडणूक लढणार; अजित पवार गटातील नेत्याचा इशारादी नगरसेविका आणि नेत्या आभा पांडे या निवडणुकीसाठी सज्ज आहे. त्याबाबत तयारीही सुरू केली आहे. याबाबत आभा पांडे म्हणाल्या की, लोकशाही आणि राजकारणात जनता सर्वोतोपरी असते. जनतेच्या आग्रहास्तव मी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. भाजपा दावा सोडेल किंवा नाही हा त्यांचा विषय मात्र मी मैदानात उतरणार आहे. नितीन गडकरींना या मतदारसंघात लीड मिळाली ती त्यांच्या व्यक्तिमत्व आणि कामाच्या पद्धतीमुळे मिळाली आहे. लोकसभेच्या निकालावरून विधानसभेचं गणित मांडता येत नाही. लोकांचा कौल कुणाच्या बाजूने आहे हे सगळ्यांना माहिती आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच जे मागील १५ वर्षापासून विकासाच्या बोंबा मारत आहेत. ३ टर्म आमदार आहेत मात्र ३ तासाच्या पावसात नागपूरात पाणी भरले. रस्त्यांची कामे पूर्ण नाहीत. अनियोजित विकासामुळे जनता त्रस्त झाली आहे. जनतेला नवा पर्याय हवा. त्यामुळे ते माझ्याकडे अपेक्षा ठेवत आहेत. महायुतीत ही जागा आमच्या वाट्याला आली नाही तरीही मी या मतदारसंघातून लढणार आहे. मी अजितदादांशी बोलली आहे. मागील ६ महिन्यापासून मी तयारी करतेय. दादांनीही सांगितले तरी मी माघार घेणार नाही. माझी लढाई खूप पुढे गेली आहे असं स्पष्टपणे आभा पांडे यांनी अजित पवारांनाही सांगितले आहे.

दरम्यान, संपूर्ण नागपूरचा कचरा हा पूर्वमधील भांडेवाडीला येतो, आजपर्यंत यासाठी आमदारांनी काय केले. एकही प्रश्न तुम्ही भांडेवाडीबाबत विधानसभेत मांडले नाहीत हे तुमचे अपयश आहे. ३०० बेड हॉस्पिटल आणलं, स्मार्ट सिटी त्यात लोकांची घरे जातायेत. मी जर निवडून आले तर कुणाचेही घर पडू न देता विकासकामे करेन. माझी तयारी ग्राऊंड लेव्हलवर सुरू आहे. काहीही असो मी निवडणूक लढणार आहे असं सांगत राष्ट्रवादी नेत्या आभा पांडे यांनी विद्यमान भाजपा आमदार कृष्णा खोपडे यांच्याविरोधात रणशिंग फुंकलं आहे.

जळगाव जामोदमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक

तरुण जखमी; पोलिसांचा हस्तक्षेप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ जळगाव जामोद (बुलढाणा) : जळगाव जामोद शहरात विसर्जन मिरवणूक सुरू असताना येथील विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक झाल्याची घटना घडली. सुमारे अर्धा तास ही दगडफेक सुरू होती. यामध्ये काही तरुण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. ठाणेदार निचळ व पोलिसांनी त्वरित हस्तक्षेप करित परिस्थिती नियंत्रणात आणली.

सदर घटना रात्री आठ ते साडे आठच्या दरम्यान चौभारा, वायली वेस या भागात घडली. या भागातील गणपती मंडळे विसर्जन मिरवणुकीत सामील झाली असताना आणि मिरवणुकपुढे सरकत असताना अचानक दगडफेक सुरु झाली. या दगडफेकीत काही तरुण जखमी झाल्याची माहिती आहे .अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात हे सुद्धा खामगाव वरून एस आर पी ची कुमक घेऊन जळगावला पोहचत एकूणच परिस्थितीचा आढावा घेत आहे.

डेंग्यू –चिकन गूनिया जलजन्य कीटकजन्य आजार बाबत डॉ विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी घेतला आढावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ अमरावती – अमरावती महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत जनतेला चांगली आरोग्य सुविधा मिळावी व पावसाळा मध्ये वाढत असलेल्या चिकन गुनीया , मलेरिया, डेंग्यू सारख्या आजारावर मात करून जनतेचे आरोग्य चांगले राहावे त्या साठी महानगर पालिका सार्वजनिक आरोग्य विभागात डॉ.रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी सह सर्व आरोग्य निरीक्षक , बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी , प्रयोग शाळा तज्ञ रक्त नमुने तपासणी करणारे सर्व वैद्यकीय चुमु व डास उत्पती उत्पादन तपासणी करणारे कर्मचारी यांची आढावा बैठक घेऊन त्यांना निर्देश दिले की घरो घरी जाऊन शहरातील नऊ लाख ते दहा लाख जनतेची आरोग्य सेवा करण्यासाठी आपल्या कडे तेरा आरोग्य केंद्र तसेच सतरा आरोग्य वर्धणी केंद्र असून वैद्यकीय अधिकारी यांच्या अंतर्गत असलेले सर्व आरोग्य कर्मचारी यांनी ताप आलेल्या रुग्णाची , कन कन वाटणाऱ्या रुग्णाची ,थंडी वाजून रस रस वाटणाऱ्या रुग्णाची वेळेवर आरोग्य केंद्रात आल्यास किंवा आशा वर्कर तसेच बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच रक्ताची तपासणी करावी व योग्य उपचार करण्यास रुग्णाला कळवावे आणि साथ रोग बद्दल डॉ रुपेश खडसे यांनी सुद्धा सर्व आरोग्य कर्मचारी यांना सांगितले की जिथे – तिथे डेंग्यू, चिकन गुनियां , मलेरिया सारखे आजार निघाल्यास आजू बाजू च्या व रुग्णाच्या परिसरात फवारणी धुवारणी करून गप्पी मासे सोडून स्वच्छ्ता राखावी व सर्व कर्मचारी यांनी जनतेला योग्य आजार बाबत माहिती देऊन जन जागृती करावी अशा सूचना देण्यात आल्या ह्या बैठकीत आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे , साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ रुपेश खडसे , किसन मदने आरोग्य निरीक्षक , हैदर अली आरोग्य निरीक्षक सर्व आरोग्य केंद्रातील आरोग्य बहुउद्देशीय कर्मचारी व ब्रेडिंग चेकर , रक्त तपासणी अधिकारी ,कर्मचारी उपस्थित होते सर्व आरोग्य विभागातील कर्मचारी यांनी निर्धार केला की डेंग्यू पासून शहर मुक्त करावा त्या साठी आम्ही काम करू व डेंग्यू शहरातून हद्दपार करू अशी प्रतिज्ञा घेतली.

देशभरातील बुलडोझर कारवाईवर बंदी

आमच्या आदेशाशिवाय बांधकामे पाडू नका: सर्वोच्च न्यायालय

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाने देशभरात बुलडोझरच्या कारवाईवर बंदी घातली आहे. न्यायालयाच्या सूचनेनुसार ही बंदी ३१ ऑक्टोबरपर्यंत लागू असेल. मात्र, रस्ते, पदपथ किंवा रेल्वेमार्ग अडवून केलेल्या बेकायदा बांधकामांबाबतही बंदी लागू असणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर बुलडोझर कारवाईबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करणार असल्याचे सांगितले आहे.

न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने वेगवेगळ्या राज्य सरकारांनी आरोपींच्या इमारती पाडण्याच्या कारवाईविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर हे निर्देश दिले आहेत. पुढील सुनावणीपर्यंत आमची परवानगी घेऊनच कारवाई करावी, असे न्यायालयाकडून सांगण्यात आले. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १ ऑक्टोबरला होणार आहे.

याचिकाकर्त्या जमियत उलेमा-ए- हिंदच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत भाजपशासित राज्यांमध्ये मुस्लिमांना लक्ष्य करून बुलडोझरची कारवाई करण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

गुजरातमधील एका खटल्याची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझर कारवाईबाबत प्रश्न उपस्थित केले होते. न्यायमूर्ती हृषिकेश रॉय, न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भाटी यांच्या खंडपीठाने म्हटले होते की, केवळ एखाद्या खटल्यातील आरोपी असल्यामुळे त्याच्या घरावर बुलडोझर चालवणे योग्य नाह

एखाद्या व्यक्तीच्या चुकीची शिक्षा त्याच्या कुटुंबातील सदस्यांना दिली जाउ शकत नाही. न्यायालय अशा बुलडोझर कारवाईकडे दुर्लक्ष करू शकत नाही. अशी कारवाई होऊ देणे म्हणजे कायद्याच्या नियमावरच बुलडोझर चालवण्यासारखे होईल असेही कोर्टाने म्हटले होते.

आभाळ कोसळणार नाही

आठवडाभर हे बांधकाम थांबवले तर 'आभाळ कोसळणार नाही', असे सांगत खंडपीठाने कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. घटनेच्या कलम १४२ अन्वये विशेष अधिकार वापरून हे निर्देश दिले आहेत, असे खंडपीठाने म्हटले आहे. न्यायमूर्ती विश्वनाथन यांनी सुनावणीदरम्यान म्हटले की, बेकायदेशीरपणे पाडकाम झाल्याचे एकही उदाहरण आढळले, तर ते संविधानाच्या आत्म्याविरुद्ध असेल.

राजधानीत 'आतिशी' बाजी, केजरीवाल यांचा राजीनामा

आतिशी मार्लेना दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री होणार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८नवी दिल्ली – देशाची राजधानी दिल्लीची पुन्हा एकदा कमान महिलेच्या हाती गेली आहे. आम आदमी पक्षाच्या बैठकीत नव्या मुख्यमंत्रिपदासाठी आतिशी मार्लेना यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मंगळवारी सायंकाळी आतिशी यांनी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्यासोबत नवीन सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांची भेट घेतली. काल आपच्या आमदारांची केजरीवाल यांच्या निवासस्थानी बैठक पार पडली. त्यात आतिशी यांची सभागृह नेतेपदी निवड केली. ईडीने अटक केल्यानंतर अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळाला. पाच महिन्यांनी दिल्ली विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.त्यामुळे निवडणुकीपर्यंत आपण मुख्यमंत्रीपदी राहणार नाही. त्यानंतर जनतेची इच्छा असेल तर ते पुन्हा निवडून देतील, अशी घोषणा करून मुख्यमंत्रीपद सोडण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार काल राजीनामा देत 'आप'च्या फायर ब्रँड नेत्या आतिशी मार्लेना यांच्या नावाची घोषणा केली.

आपचे नेते गोपाल राय यांनी सांगितले की, आतिशी यांच्याकडे पक्षाने दोन प्रमुख जबाबदाऱ्या दिल्या आहेत.एक म्हणजे, दिल्लीच्या जनतेसाठी पक्षाने सुरू केलेले काम चालू ठेवणे. दुसरे त्यामुळे निवडणुकीपर्यंत आपण मुख्यमंत्रीपदी राहणार नाही. त्यानंतर जनतेची इच्छा असेल तर ते पुन्हा निवडून देतील, अशी घोषणा करून मुख्यमंत्रीपद सोडण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार काल राजीनामा देत 'आप'च्या फायर ब्रँड नेत्या आतिशी मार्लेना यांच्या नावाची घोषणा केली. म्हणजे, दिल्ली सरकारच्या धोरणांना भाजपाकडून नख लावण्याचा प्रयत्न केला जात आहे.प्रयत्न हाणून पाडण्याचीही जबाबदारी त्यांच्यावर आहे. आतिशी यांच्याकडे सध्या वित्त, शिक्षण आणि सार्वजनिक बांधकाम अशी प्रमुख खाती आहेत.

नवाब मलिक यांच्या जावयाच्या कारचा भीषण अपघात; समीर खान गंभीर जखमी



विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८ मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांच्या कारचा भीषण अपघात झाला आहे. हा अपघात कुर्ला येथे झाला असून या अपघातात समीर खान गंभीर जखमी झाले आहेत. मुंबई पोलिसांनी ही माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, नवाब मलिक यांची मुलगी आणि जावई रुग्णालयात नियमित तपासणी करून परतत होते. ते कारमध्ये बसले असताना कार चालकाने चुकून क्सिलेटर दाबल्याने कार भिंतीवर आदळली. समीर खान यांच्या डोक्याला दुखापत झाली असून ते सध्या आयसीयूमध्ये आहेत.

या अपघातात नवाब मलिक यांची मुलगी निलोफर यांनाही दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. हा अपघात मुंबईतील कुर्ला येथे झाला.

'स्वच्छता ही सेवा पंधरवड्या'चा विभागीय आयुक्तालयात शुभारंभ

स्वच्छता हा जीवनशैलीचा मुलभूत सिद्धांत बनवा –उपायुक्त संजय पवार

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८अमरावती– राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून, २ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने १७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर हा कालावधी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा म्हणून विभागात सर्वत्र राबविण्यात येणार असून मोहिमेचा आज विभागीय आयुक्तालयात शुभारंभ करण्यात आला. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी स्वच्छता हा केवळ सरकारी मोहिमेचा भाग नाही, तर तो नागरिकांच्या जीवनशैलीचा मुलभूत सिद्धांत बनला पाहिजे, असे प्रतिपादन महसूल उपायुक्त संजय पवार यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आज स्वच्छता ही सेवा पंधरवड्याचा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थित शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. उपायुक्त गजेंद्र बावणे, नगरपालिका प्रशासनचे सहाय्यक आयुक्त श्यामकांत मस्के, सहाय्यक आयुक्त गिता वंजारी, वैशाली पाथरे, तुकाराम

टेकाडे, सुशील आग्रेकर यांच्यासह अन्य शाखांचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले की, स्वच्छतेबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करुन स्वच्छता हा जीवनशैलीचा भाग होण्यासाठी संपूर्ण देशभरात 'स्वच्छ भारत मोहिम' राबविण्यात येते. आजही अनेकांकडून अजाणतेपणी स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्या जाते. यासंबंधी अधिक गंभीर होवून स्वच्छता हा सवयीचा भाग होणे आवश्यक आहे. परदेशात तेथील जनता व सरकार स्वच्छतेसंबंधी अधिक सजग असून तसे नियमच त्या देशात तयार करण्यात आले आहे. त्यामुळे तेथील नद्या, सरोवर, रस्ते, परिसर, बाजारपेठा, नागरि वसाहती ह्या स्वच्छ व सुंदर आहेत. आपल्याकडेही त्याचप्रमाणे सार्वजनिक व घरेलू स्वच्छता होण्यासाठी तसे संस्कार व सवय स्वत:सह इतरांनी अंगिकारणे आवश्यक आहे. स्वच्छता ही सेवा या मोहिमेत सर्वांनी स्वयंस्फुर्तीने सहभाग घेऊन मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी सांगितले.

दररोज विभागीय आयुक्त कार्यालय व परिसर स्वच्छ करणाऱ्या महिला-पुरुष स्वच्छताकर्मींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव यावेळी करण्यात आला. दरवर्षी शंभर तास म्हणजेच प्रत्येक आठवड्यातून २ तास श्रमदान करुन स्वच्छतेचा संकल्प पूर्ण करण्याबाबतची 'स्वच्छतेची शपथ' यावेळी उपस्थितांना देण्यात आली. या कार्यक्रमानंतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या परिसराची स्वच्छता करुन श्रमदान केले.

राज्याला महिला मुख्यमंत्री हव्या पण रश्मी ठाकरेंचं नाव नको; किशोरी पेडणेकर असं का बोलल्या?

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८नागपूर – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात मुख्यमंत्रिपदावरून चर्चेला उधाण आलं आहे. उद्धव ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी मविआनं मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करावा अशी मागणी केली होती. मात्र काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीनं ही मागणी धुडकावल्यानंतर आता ठाकरे गटानेही या मागणीचा जोर कमी केला आहे. त्यात अधूनमधून राज्यात महिला मुख्यमंत्रिपदावरही बोललं

जाते. त्यात रश्मी ठाकरे यांचे नावही यापदासाठी चर्चेत येते. त्यावरूनच ठाकरे गटाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी रश्मी ठाकरेंना राजकारणात रस नाही असं सांगितले आहे.राज्याला महिला मुख्यमंत्री मिळणार का या पत्रकारांच्या प्रश्नावर किशोरी पेडणेकर म्हणाल्या की, रश्मी ठाकरे यांनी कधीही राजकारणा इंटरेस्ट घेतलेला नाही. त्या त्यांच्या पतीच्या सोबत असतात. याचा अर्थ त्या राजकारणात आहेत असं होत नाही. त्यामुळे राज्यात महिला मुख्यमंत्री व्हायला पाहिजे पण कारण नसताना रश्मी वहिनीचं नाव असता कामा नये असं त्यांनी म्हटलं आहे. नागपूरात पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला.

'राहुल गांधींची जीभ छाटू नये, चटके द्यायला हवे', भाजप खासदाराचे खळबळजनक विधान

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८ अमरावती– राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबत केलेल्या मुद्द्यावरुन सध्या वाद सुरु आहे. याबाबत बोलताना शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी 'राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्यास ११ लाखांचे बक्षीस देईन,' असे वादग्रस्त विधान केले. संजय गायकवाड यांच्या या विधानावरुन काँग्रेस नेत्यांनी संताप व्यक्त केला तसेच गायकवाड यांच्यावर गुन्हाही दाखल झाला होता. अशातच राहुल गांधींची जीभ छाटू नये,त्यांच्या जिभेला चटके द्यायला हवे' असे खळबळजनक विधान भारतीय जनता पक्षाचे खासदार अनिल बोंडे यांनी केले आहे.शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्याला अकराला बक्षीस देणार असे वादग्रस्त विधान केले होते. संजय गायकवाड यांच्या या विधानावरुन काँग्रेससह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संताप व्यक्त केला होता. संजय गायकवाड यांचे वादग्रस्त विधान ताज असतानाच आता भारतीय जनता पक्षाचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या विधानासंदर्भात केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. संजय गायकवाड यांनी जीभ छाटण्याची केलेली भाषा योग्य नाही. परंतु राहुल गांधी आरक्षणासंदर्भात जे बोलले ते अतिशय भयानक आहे, विदेशात जाऊन वात्रटासारखं कोणी बोलत असेल तर त्यांची 'जीभ छाटू नये जिभेला चटके मात्र दिले पाहिजे' अशा लोकांना जिभेला चटके देणे आवश्यक आहे, असे वादग्रस्त विधान अनिल बोंडे यांनी केले आहे.तसेच राहुल गांधी, ज्ञानेश महाराव असो अथवा श्याम मानव असोत असे म्हणत भाजप खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी ज्ञानेश महाराव श्याम मानव यांच्यावरही टीका केली आहे. भारतामधील बहुसंख्यांकांच्या भावना जे दुखावतात त्या लोकांना किमान जाणीव तरी करून द्यायला हवी म्हणून 'जीभ छाटू नये तर जिभेला चटके' मात्र निश्चितच दिले पाहिजे असा पुनरउल्लेख सुद्धा डॉ. अनिल बोंडे यांनी केला. दरम्यान, संजय गायकवाड यांच्या विधानावरुन वाद सुरु असतानाच आता अनिल बोंडे यांनी केलेल्या वक्तव्याने काँग्रेस आक्रमक होण्याची शक्यता आहे.

मॅम नव्हे, माँ अमृता फडणवीस, मंगलप्रभात लोढा यांच्याकडून उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नीचं कौतुक!

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१८मुंबई : गणेश विसर्जनानंतर दरवर्षी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या दिव्याज फाउंडेशनच्यावतीने समुद्र किनारे स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली जाते. यंदाही गणेश विसर्जनानंतर दिव्याज फाउंडेशनच्यावतीने बुधवारी (दि.१८) वर्सोवा किनारपट्टीवर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

बुधवारी सकाळी अमृता फडणवीस समुद्रकिनारा स्वच्छ करण्यासाठी वर्सोवा येथे पोहोचल्या. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर आदी मंडळी उपस्थित होती. यादरम्यान, मंगलप्रभात लोढा यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी अमृता फडणवीस यांच्या कामाचे तोंडभरुन कौतुक केले.

आपण मुंबईतील चौपाटीवर असलेला कचरा साफ करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेता. पण आता आपण राज्यातील राजकारणातील कचरा साफ करण्यासाठी सुद्धा पुढाकार घ्यायला हवा, अशी मी आपणास विनंती करतो. अमृता फडणवीस यांनी आईचे रूप घेतलेले आहे.

मुला मुलींसाठी त्या जे काम करत आहेत, त्यामुळं मी आजपासून त्यांना मॅम अमृता नाही तर माँ अमृता फडणवीस म्हणेन, असे मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले. त्यामुळे नेहमी

कोणत्या-ना-कोणत्या कारणावरून चर्चेत असणाऱ्या अमृता फडणवीस पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत.

क्षेत्र कोणतंही असो स्वच्छता हवी – अमृता फडणवीस

अमृता फडणवीस यांनी म्हटले की, आपण शहरं, नद्या, समुद्र स्वच्छ ठेवायला पाहिजेत. आपण ते स्वच्छ राहतील याची काळजी घेऊन तेव्हाच आपली आर्थिक प्रगती साधू. कोणत्याही प्रकारची आर्थिक प्रगती साधण्यासाठी आधी आपण आपली शहरं स्वच्छ ठेवायला हवीत. आपण देव, धर्म मानणारे लोक आहोत. देवाला स्वच्छता आवडते. त्यामुळे क्षेत्र कोणतंही असो, आपण स्वच्छता ठेवली पाहिजे. मग ते राजकारण असो किंवा आपले मन. कोणत्याही सेक्टरमध्ये काही ना काही घाण असते. त्यामुळे आपण स्वच्छतेवर भर द्यायला हवा. कॉर्पोरेट असो की पॉलिटिक्स आपण सर्वत्र स्वच्छता ठेवायला हवी, असेही अमृता फडणवीस यांनी सांगितले.

आरोग्य विभागामुळे मेळघाटातील साथ आटोक्यात

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ अमरावती

मेळघाटातील जामली येथे अतिसाराची लागण झाल्याची माहिती आरोग्य विभागाला प्राप्त झाली. आरोग्य विभागाने केलेल्या तातडीच्या प्रतिसादाने येथील साथ आटोक्यात आली आहे.

स्थानिक मोहन गायन यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले यांना अतिसाराची लागण झाल्याची माहिती दिली. प्राथमिक आरोग्य केंद्र टेम्ब्रुसोंडाच्या अंतर्गत जामली उपकेंद्रातील जामली गावामध्ये अतिसाराच्या रुग्णसंख्येत वाढ झाली असल्याचे निदर्शनास येताच जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या जिल्हास्तरीय शिघ्र प्रतिसाद पथकातील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, माताबाल संगोपन अधिकारी डॉ. सुभाष ढोले, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी आणि पथकातील सदस्यांनी गावाला तातडीने भेट दिली. तसेच सखोल चौकशी करून तातडीच्या उपाययोजना करण्यात आल्या.

गावात दोन सार्वजनिक विहिरी असून एका विहिरीच्या आजुबाजूला नाली असल्याने पाणी साचून ते पाणी विहिरीत झिरपते. तसेच दुसरी विहिर नदीकाठी असून नदीचे गढ्ढळ पाणी पुरवठा होण्याची शक्यता आहे. या विहिरीचे पाणी नमुने दुषित आढळुन आलेले आहे. गावात २ पाण्याच्या टाक्या असून १ टाकी ५० हजार लिटर, तर दुसरी ३० हजार लिटर क्षमतेची आहे. नळ योजनेमार्फत घरोघरी पाण्याचा पुरवठा केला जातो. परंतु गावामध्ये ठिकठिकाणी नळजोडणी फुटल्याचे आढळून आले आहे. गावात खताचे ढिगारे, तुडुंब भरलेल्या नाल्या, तसेच सर्वत्र अस्वच्छता असल्याने डासांच्या घनतेत वाढ झाली आहे. त्यामुळे तापाच्या रुग्णात वाढ झाली आहे.

जामली येथील जिल्हा परिषद शाळेत रुग्णांसाठी उपचारार्थ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. याठिकाणी पुरेसा औषधसाठा उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच रुग्णांना संदर्भीत करण्यासाठी दोन रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली आहे. याठिकाणी ४३६ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

गावात ९ चमूकडून घरोघरी साथरोग सर्वेक्षण करण्यात येत आहे. दररोज पाणी नमुन्यांची ओटी चाचणी करण्यात येत आहे. तसेच आरोग्य पथकाद्वारे दररोज किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. गावात डासनाशक औषधांद्वारे धुरफवारणी करण्यात आली आहे. नाल्यांमध्ये टेमीफोस ॲक्टीव्हीटी राबविण्यात आली. डास उत्पत्ती स्थानात गप्पी मासे सोडण्यात आले आहे. घरोघरी पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी मेडीक्लोरचे वाटप करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने केलेल्या उपाययोजनांमुळे याठिकाणीच परिस्थिती नियंत्रणात आली आहे. जिल्हास्तरीय साथरोग नियंत्रण कक्षातील अधिकारी जामली येथे नियमित भेटी देत आहे. तसेच तेथील परिस्थितीचा नियमित आढावा घेत आहे. सध्या साथरोग परिस्थिती नियंत्रणात आहे.

गणपती बाप्पाच्या आनंदात अनाथ आश्रमातील मुलांना मेजवानी सोबत गिफ्ट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अमरावती

१० दिवसांच्या धामधुमीनंतर सर्वांचे लाडके गणपती बाप्पाला निरोप देऊन विजर्जित केले जाते. त्याआधी समाजातील प्रतिष्ठित लोकांसह नातेवाईक, मित्रमंडळींना महाप्रसाद रुपात जेवणाचे आमंत्रण दिले जाते. ही परंपरा झाली असून यापेक्षा वेगळा उपक्रम येथील वानखडे परिवाराने राबविला. अनाथाश्रमातील मुलांना भोजनासह वॉटर बॉटल भेट देऊन त्यांच्या आनंदात भर घातली.

गणोशोत्सवादरम्यान लोक आपल्या जवळच्या लोकांना घरी बोलवून जेवण देतात. अनेक प्रतिष्ठित लोकांनाही जेवण दिलं जातं. यातही काही लोक सामाजिक बांधिलकी जपत आणि आपली समाजाप्रति जबाबदारी दाखवत वेगळं काहीतरी करतात. असंच काहीसं ऋतिक वानखडे याबाबत सांगता येईल.

१७ सप्टेंबर २०२४ रोजी राजेंद्र वानखडे यांनी आपल्या घरच्या गणपतीचे जेवण अनाथ आश्रमातील मुला-मुलींना देण्याचे ठरविले. ही संकल्पना त्यांच्या परदेशात राहणाऱ्या मुलाची होती. राजेंद्र वानखडे यांचा मुलगा ऋतिक वानखडे हा अमरावती येथील रहिवासी असून सध्या तो थायलँड येथे यूएफसी फेडरेशनमध्ये नोकरी करीत आहे.

जीवनात मनातील श्रद्धेला फार मोठे स्थान आहे. ऋतिकने थायलँड येथून गोकुळ अनाथ आश्रमामध्ये गणपतीचे जेवण देण्याची तयारी दर्शविली. त्याअनुषंगाने त्याच्या आई वडिलांनी मुलाची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने गणपतीचे संपूर्ण जेवण तयार करून अमरावती येथील गोकुळ अनाथ आश्रममध्ये अनाथ व निराधार मुलांना जेवण देऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला.

अनाथ आश्रमातील मुलांना केवळ जेवण देऊनच ते थांबले नाही तर जेवणानंतर संपूर्ण अनाथ मुलांना भेट म्हणून वाटर बॉटलचे वाटप करण्यात आले. अनाथ आश्रम ट्रस्टच्या संचालिका गुंजनताई यांनी आम्हाला मुलांची वेळ व तारीख उपलब्ध करून देण्यामध्ये मदत केली त्यामुळे आश्रमाचे व त्यांचे आभारी आहोत, असं राजेंद्र वानखडे म्हणाले.

विद्यापीठात आजीवन अध्ययन अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी प्रचंड मागणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अमरावती

एम.ए.समुपदेशन व मानसोपचार आणि एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन या अभ्यासक्रमास समाजातील सर्व स्तरातील पदवीधर युवक - युवती, प्रौढ व्यक्ती, गृहिणी महिला, ज्येष्ठ नागरिकांची सुद्धा प्रवेशाकरिता प्रचंड मागणी असून शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये विद्यापीठाने निर्धारित करून दिलेल्या आसन क्षमतेपेक्षा विद्यार्थांच्या वाढत्या प्रतिसादामुळे १० टक्क्यांची वाढीव मागणी आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत करण्यात आली व ती कुलगूरू डॉ मिलींद बारहाते यांनी मान्य केली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये कौशल्य विकासावर आधारित विविध पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यामध्ये एम.ए / पी.जी. डिप्लोमा समुपदेशन व मानसोपचार या दोन्ही पदवी व पदविका अभ्यासक्रमाची आसन क्षमता १०० एवढी असून दहा टक्के वाढीव क्षमतेने ११० विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले आहे. याबरोबरच एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तार या अभ्यासक्रमाची ४० एवढी असून ४४ प्रवेश, एम.ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन अभ्यासक्रमाची ४० एवढी असून ४४ प्रवेश, एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाची ८० एवढी असून ८८ प्रवेश, पी.जी. डिप्लोमा योग थेरपी अभ्यासक्रमाची ४० एवढी असून ४४ प्रवेश, पी.जी. डिप्लोमा कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश अभ्यासक्रमाची ४० एवढी असून ४४ प्रवेश, पी.जी. डिप्लोमा नॅचरोपॅथी ॲन्ड यौगिक सायन्स या अभ्यासक्रमाची ४० एवढी आसन क्षमता असून दहा टक्के वाढीव क्षमतेने ४४ प्रवेश पूर्ण झाले आहेत. अशा कौशल्यपूर्ण व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांच्या वाढत्या प्रतिसादामुळे विद्यापीठाने निर्धारित करून दिलेल्या विद्यार्थी आसन क्षमतेपेक्षा दहा टक्के प्रवेशाची पूर्तता करून सुद्धा अजूनही वेगवेगळ्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांची प्रवेशाकरिता मागणी सुरू आहे व याच विद्यार्थ्यांच्या प्रचंड मागणीमुळे कुलगुरू यांना पुन्हा १० टक्के वाढीव क्षमता देण्यात यावी, अशी प्रवेश घेऊ इच्छिणाया विद्यार्थ्यांकडुन मागणी आहे. यावरून आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील अभ्यासक्रमाचे कौशल्ययुक्त व रोजगाराभिमुख असलेले धोरण निश्चित होते. एवढेच नव्हे तर या विभागातील अभ्यासक्रमासाठी पुढील शैक्षणिक सत्राकरिता काही विद्यार्थ्यांनी आतापासूनच प्रवेश निश्चित केले आहे. या व्यतीरीक्त ज्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षाकरिता विभागामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावयाचे असतील, त्यांनी आतापासुनच विभागाच्या स्तरावर नोंदणी करावी, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

नागपूर-अमरावती महामार्गावरचा फ्लायओव्हर ठरणार गेमचेंजर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ नागपूर

नागपूरकरांचा प्रवास आता सुस्साट होणार...

नागपूरकरांसाठी मोठी आनंदांची बातमी समोर येत आहे. नागपूर - अमरावती महामार्गावर नागपूरच्या वेशीवर होणाऱ्या वाहतूक कोंडीपासून आता दिलासा मिळणार आहे. कारण राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने विक्रमी वेळेत नागपूर जवळच्या वाडीमध्ये सुमारे अडीच किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल बांधून तयार केला आहे. आज सकाळपासून हा उड्डाणपूल टेस्टिंगच्या उद्दिष्टाने सामान्य वाहन चालकांसाठी सुरू करण्यात आला आहे.

वाडी मधील १० नंबर नाकापासून सुरू झालेला हा उड्डाणपूल अडीच किलोमीटर लांबीचा असून या उड्डाणपुलामुळे वाडी टी-पॉइंट वर होणारी वाहतूक कोंडी आता होणार नाही. आता वाहन चालकांना उड्डाण पुलावरून थेट अमरावतीच्या दिशेने वाडी शहराच्या बाहेर निघता येणार आहे. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नागपूर - अमरावती महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी केंद्र सरकारने ही मोठी घोषणा केली होती, ज्यामध्ये नागपूर आणि वाडीमध्ये एका नंतर एक दोन उड्डाणपूल बांधले जातील. दोन उड्डाणपूल आणि सिमेंट रस्त्याचा हा प्रकल्प ४७८ कोटी रुपयांचा होता. या प्रकल्पात वाडी मधील उड्डाणपूल विक्रमी वेळेत बांधून पूर्ण करण्यात आला आहे. आज सकाळपासून याची टेस्टिंग सुरू करण्यात आल्यामुळे सामान्य वाहन चालकांना यावर पहिल्यांदाच प्रवेश मिळाला आहे. त्यामुळे नवीन उड्डाणपूल पाहण्यासाठी आणि त्याच्यावरून वाहन चालवण्यासाठी सकाळपासूनच मोठी गर्दी होत आहे.

१४ एकरमधील सोयाबीनवर शेतकऱ्याने फिरविला ट्रॅक्टर

सततच्या पावसाने नुकसान : पिकाची वाढ खुंटली, फुले, शेंगा नाहीत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ धामणगाव रेल्वे

वसाड धामणगाव रेल्वे तालुक्यातील कावली वसाड परिसरात चिंचपूर येथील शेतकरी प्रदीप बांबल यांनी १४ एकर सोयाबीन पिकावर ट्रॅक्टर फिरविला आहे. सततच्या पावसाने सोयाबीनची वाढ खुंटली व फुले, शेंगा नसल्याने त्यांनी हा निर्णय घेतला.

बांबल यांनी १४ एकरमध्ये सोयाबीनची पेरणी केली होती.. मात्र, दीड महिन्यापासूनच्या पावसाने सोयाबीनची वाढ खुंटली, पिवळे पडले, पिकाला फुले- शेंगा पकडल्याच नाही. त्यामुळे पिकाचे उत्पन्न होण्याची शक्यता नसल्याने त्यांनी सोयाबीनवर ट्रॅक्टर फिरविला आहे. यंदा सततचा पाऊस, ढगाळ वातावरण, अतिवृष्टी यामुळे पिकांची वाढ खुंटली, त्यामुळे उत्पादन होण्याची शक्यता नसल्याने बांबल यांनी सांगितले. या परिसरात कपाशी, सोयाबीन, तूर पिकाचे सततचा पाऊस व अतिवृष्टीने मोठे नुकसान झालेले आहे. रब्बीत पेरणी करणार खरिपाचा खर्च वाया सोयाबीनवर आतापर्यंत दोन ते अडीच लाखांचा खर्च झालेला आहे. मात्र, उत्पादन खर्च तर दूर पेरणीचा खर्चही निघणे कठीण असल्याने सोयाबीनवर ट्रॅक्टर फिरविला आहे. या शेतामध्ये रब्बी हंगामातील गहू व हरभरा लावणार आहे. मात्र, खरिपाचा खर्च पूर्ण वाया गेल्याचे बांबल म्हणाले.

> १४ एकर सोयाबीनला आतापर्यंत अडीच लाखाचा खर्च झालेला आहे. मात्र, सततच्या पावसाने पिकाची वाढ खुंटली व सोयाबीनला फुले, शेंगा नसल्याने उत्पादनाची अपेक्षा नाही, त्यामुळे पिकावर ट्रॅक्टर फिरविला.
>
> **-प्रदीप बांबल,**
> **शेतकरी, चिंचपूर**

...तरच मी माझे शब्द मागे घेईन; संजय गायकवाड यांनी राहुल गांधींसमोर ठेवली मोठी अट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८बुलढाणा

काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत जाऊन भारतातील आरक्षण संपवण्यासंदर्भात विधान केले. यानंतर राजकीय वर्तुळात अनेक प्रतिक्रिया उमटल्या. राहुल गांधींवर बोचऱ्या शब्दांत टीका करण्यात आली. शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधींबद्दल केलेल्या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. काही ठिकाणी गुन्हेही दाखल करण्यात आले. यानंतर आता संजय गायकवाड यांनी राहुल गांधींसमोर एक अट ठेवली आहे.

मीडियाशी बोलताना संजय गायकवाड म्हणाले की, राहुल गांधी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला आहे, संविधानाचा अपमान केला आहे. संपूर्ण देशाच्या पीडित समाजाचा अपमान केला आहे. त्यांनी मुंबईच्या चैत्यभूमीवर जाऊन तिथे माथा टेकावा किंवा नागपूरच्या दीक्षाभूमिवर माथा टेकावा. बाबासाहेब आंबेडकरांची माफी मागावी. राहुल गांधी यांनी तसे केले तर जी घोषणा केली आहे की, त्याबाबत माझे शब्द मी मागे घेईन, असे गायकवाड यांनी स्पष्ट केले.काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी संजय गायकवाड यांच्याविरोधात दिल्लीत तक्रार करण्यात आली आहे.

आजपासून माय भारत पोर्टलवर युवकांची नोंदणी : विविध उपक्रमाचे होणार आयोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि. १८ अमरावती

केंद्र शासनातर्फे युवकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्यात येणार आहे. ही नोंदणी बुधवार, दि. १८ सप्टेंबरपासून सुरवात होणार आहे. यासाठी युवकांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण व क्रीडा विभागा मार्फत दि. १८ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर दरम्यान युवकांच्या सहभागाने युवांची नोंदणी, अनुभवात्मक शिक्षण, सेवाकार्य, स्वच्छता, फिट इंडिया उपक्रम, पंधरवाडा अंतर्गत विविध उपक्रमाची नोंदणी माय भारत पोर्टलवर करावी लागणार आहे.

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय, तसेच राष्ट्रीय छात्र सेना, स्काउट गाईड आणि प्रशिक्षणार्थ्यांनी mybharat.gov.in या संकेतस्थळावर २५ सप्टेंबर नोंदणी करावी लागणार आहे. १५ ते २९ वयोगटातील युवकांनी यात नोंदणी करावी. तसेच दि. १८ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोंबर या कालावधीत विविध उपक्रमांची नोंदणी करावी लागणार आहे.

सामाजिक कार्य, अनुभवनात्मक शिक्षण, कौशल्याच्या संधी, नवीन संकल्पना, आरोग्य, सायबर सुरक्षा, रस्ते सुरक्षा, पोलिस स्वयंसेवक, कौशल्य विकासात्मक कार्यक्रमासाठी नोंदणी करता येणार आहे.

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय, संस्था, क्रीडा मंडळांनी माय भारत पोर्टलवर उपक्रमाची नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

विसर्जन सोहळ्याला गालबोट, राज्यात १५ जणांचा मृत्यू, नाशिक-धुळे अन् अमरावतीमध्ये हळहळ!

भातकुली तालुक्यातील पूर्णा नदी परिसरातील घटना

विदर्भ प्रजासत्ताक दि. १८ अमरावती

एक दोन तीन चार, गणपतीचा जय जयकार, 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया अशा जयघोषात फुलांची मनसोक्त उधळण करत उत्साह आणि भावपूर्ण वातावरणात लाडक्या गणरायाला राज्यभरात निरोप दिला. भक्तिमय वातावरणात लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. पुढच्या वर्षी लवकर , असे म्हणत जड अंतकरनाने गणेशभक्तांनी लाडक्या बाप्पाला अखेरचा निरोप दिला. पण याच उत्सवाला राज्यात अनेक ठिकाणी गालबोट लागले आहे. राज्यभरात १५ जणांचा मृत्यू झालाय. धुळ्यात ट्रक्टरखाली चिरडून ३ बालकांच मृत्यू झाला. तर नाशिक, अमरावतीमध्ये काही जण वाहून गेले. जिंतूरात ऊा च्या आवाजामुळे एकाचा मृत्यू झालाय. गणपती विसर्जनावेळी राज्यात १३ जणांचा मृत्यू झाल्याचं आतापर्यंत समोर आलेय.

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात गणेश विसर्जनादरम्यान दोन जण पूर्णा नगर नदीपात्रात वाहून गेल्याची घटना घडली आहे. यामध्ये मयूर गजानन ठाकरे, अमोल विनायक ठाकरे यांचा समावेश आहे. दर्यापुर तालुक्यांतील दारापूर येथील गणपती विसर्जनादरम्यान राजेश संजय पवार हा २७ वर्षीय युवक पाण्यामध्ये बुडाला . जिल्हा शोध बचाव पथक आज सकाळी पूर्णा नदीत पात्रात दाखल झाले असून शोध कार्य सुरु केले आहे.

मिळालेल्या माहिती नुसार अचलपूर तालुक्यातील ईसापुर शहापूर येथील सार्वजनिक गणेश मंडळात बसविलेल्या गणपती घेऊन विसर्जनासाठी भातकुली तालुक्यातील पूर्णा नदीवर आलेत गणपती विसर्जनाकरिता अमोल ईश्वरदास ठाकरे व मयूर गजानन ठाकरे वाहन गेलेत दर्यापुर तालुक्यांतील दारापूर येथील गणपती विसर्जनादरम्यान राजेश संजय पवार हा २७ वर्षीय युवक पाण्यामध्ये बुडाला . जिल्हा शोध बचाव पथक आज सकाळी पूर्णा नदीत पात्रात दाखल झाले असून शोध कार्य सुरु केले आहे. पाण्याचा अंदाज न आल्या कारणाने हे तिघेही पूर्णा नदी पात्रात वाहून गेले. यातील अमोल आणि मयूर हे काका पुतणे असल्याची माहिती आहे. आज सकाळी रेस्क्यू पथकाने शोध मोहिमे हाती घेतली असता राजेश संजय पवार यांचा मृतदेह १००मीटर अंतरावर मिळून आला उर्वरित दोघांचा शोध आता रेस्क्यू पथक घेत आहे.

खा. डॉ.अनिल बोंडे यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी काँग्रेसची पोलीस आयुक्तालयात धडक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ अमरावती

भाजपाचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्या चा निषेध करीत कारवाई करण्याची जोरदार मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. बोंडे यांच्या विधानाची दखल घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी आमदार ड.यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे , काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी आमदार विरेंद्र जगताप, माजी महापौर विलास इंगोले, प्रवक्ते मिलींद चिमोटे यांच्यासह जिल्हा काँग्रेस समितीच्या कार्यकर्त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात जाऊन आयुक्तांना गराडा घालत मागणी केली. राज्यसभेचे खासदार डॉक्टर अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे बद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून बोंडे यांच्याविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. डॉक्टर अनिल बोंडे यांनी काँग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते यांच्या संदर्भात प्रसिद्धी माध्यमांसमोर राहुल गांधी यांच्या जिभेला चटके दिले पाहिजे असे विधान केले. हे विधान अत्यंत

आक्षेपार्ह आणि निंदनीय आहे. असे निवेदन करून समाजामध्ये राहुल गांधी यांचे बद्दल द्वेष निर्माण करून त्यांच्यावर लोकमानसातून हल्ला व्हावा याकरिता उद्युक्त करण्यात आले आहे. त्यामुळे देशाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचा आरोप ड.यशोमती ठाकूर यांनी यावेळी केला.

बोंडे यांनी अशा पद्धतीने उद्युक्त करणारे केलेले हे विधान फौजदारी गुन्हेगारी स्वरूपाचे आहे डॉक्टर बोंडे हे गेल्या चार ते पाच वर्षांपासून सातत्याने धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच काँग्रेसच्या नेत्यांविरोधात हल्ले व्हावेत, असा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांचा तात्काळ अटक करावी अशी मागणी यावेळी उपस्थित नेत्यांनी पोलीस आयुक्तांना गराडा घालत केली. जम्मू काश्मीर आणि हरियाणा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अशा पद्धतीने वक्तव्य करून समाजामध्ये तेढ निर्माण करणे आणि दंगली भडकवण्याचा बोंडे यांचा प्रयत्न असल्याचा आरोपही यावेळी काँग्रेसच्या नेत्यांनी केला. राहुल गांधी हे सार्थक त्याने तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी झटत आहेत काम करत आहेत त्यांच्या प्रश्नांवर बोलत असल्याने केंद्र सरकारला त्यांचे वावडे निर्माण झाले आहे. बोंडे यांनी हे विधान प्रसार माध्यमांसमोर केले आहे तसेच समाज माध्यमांवरही ते व्हायरल होत असल्याने राहुल गांधी यांच्या जीवाला धोका निर्माण झाल्यामुळे तातडीने बोंडे यांना अटक करावी अशी मागणी यावेळी ड.ठाकूर यांनी केली.यावेळी आमदार ड.यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे , काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलु शेखावत, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी आमदार विरेंद्र जगताप, माजी महापौर विलास इंगोले, प्रवक्ते मिलींद चिमोटे, हरीष मोरे, हरीभाऊ मोहोड, भैय्या पवार, प्रविण मनोहर, अमित गावंडे, वैभव देशमुख, शैलेष काळबांडे, जयश्री वानखडे, अंजली ठाकरे, शोभा शिंदे, बंडु हिवसे, राजु बोडखे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. अनिल बोंडेचं संतुलन बिघडलं – यशोमती ठाकूर

यशोमती ठाकूर म्हणाल्यात डॉ. अनिल बोंडेचं संतुलन बिघडलं आहे. त्यांनी मेंटल हॉस्पिटलमध्ये भरती झालं पाहिजे. एखादा अडाणी माणून बोलला तर आपण म्हणू तो अडाणी आहे. हा तर डॉक्टर आहे. बेअक्कल, मूर्ख माणूस आहे.याला महाराष्ट्रामध्ये आणि अमरावतीमध्ये दंगल घडवायची आहे. म्हणून ही अशी वक्तव्य करतो आहे. तुम्ही जरा खबरदारी राखा देवेंद्रजी. तुम्ही ही फेक नेरेटिव्हचं बादशाह आहात आणि तुमचे हे जे चमचे आहेत यांना पण तुम्ही सांभाळा. तुम्ही प्रवृत्त करता.यासोबतच त्या पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्र तुम्हाला माफ करणार नाही. महाराष्ट्राचं संतुलन बिघडवण्याचे काम हे लोक करत आहेत. यांना अजिबात महाराष्ट्र माफ नाही करणार. असे यशोमती ठाकूर म्हणाल्या.

खा. अनिल बोंडे यांच्याविरोधात राजपेठ ठाण्यात गुन्हा दाखल

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्या नंतर काँग्रेसने आक्रमक होत आज पोलीस आयुक्त कार्यालयावर धडक देत ठिय्या आंदोलन करीत खा. अनिल बोंडे विरोधात गुन्हा दाखल करण्याची तक्रार केली होती. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलीस आयुक्त कार्यालयात २ तास ठिय्या दिल्या नंतर खा. अनिल बोंडे यांच्या विरोधात राजपेठ पोलीस ठाण्यात कलम १९२, ३५१ (२), ३५६ (२) अन्यवे धमकी देणे व इतर व्यक्ती विरोधात बोलणे या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी दिली

नवीनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त

तिसऱ्या आघाडीला एमआयएम नको बच्चू कडूंनी त्यामागचं कारणही सांगितलं

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती

राज्यात विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु आहे. आघाडी आणि युतीमध्ये बैठकांवर बैठका होत आहेत. त्यातच आता तिसऱ्या आघाडीचा प्रयत्नही केला जातोय. बच्चू कडू यांच्याकडून तिसऱ्या आघाडीची स्थापना करण्यात येणार आहे. पण या तिसऱ्या आघाडीमध्ये बच्चू कडू यांनी एमआयएमला घेणार नसल्याचे सांगितले आहे. बच्चू कडू यांनी त्यामागील कारणही स्पष्टपणे सांगितले आहे.

उद्या गुरुवारी तिसऱ्या आघाडीसंदर्भात बच्चू कडू, राजू शेट्टी, छत्रपती संभाजी राजे आणि अन्य नेत्यांची महत्त्वाची बैठक होणार आहे. तिसरी आघाडीची महाशक्ती निर्माण करणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. इतरांची आघाडी आणि युती तर आमची जनतेची शक्ती राहील.एमआयएम अथवा धार्मिक प्रखरता असणाऱ्यांना सोबत घेणार नाही. आमची लढाई जाती धर्मापलीकडे आहे. एमआयएम ची प्रखरता पचवणं आम्हाला शक्य नाही. धार्मिक कटुता निर्माण करणाऱ्या पक्षापासून आम्ही दूर राहणार असल्याचे यावेळी बच्चू कडू यांनी सांगितले.

तिसरी आघाडीवर काय म्हणाले?

तिसरी आघाडी म्हणजे आमची महाशक्ती राहणार आहे. आमची वैचारिक बैठक होईल, ते मुद्दे घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. सत्ताही विकेंद्रीकरण असले पाहिजे, असे कडू म्हणाले.

महायुतीला प्रस्ताव दिलेला होता त्यात अजून विचार झालेला नाही. त्यांच्याकडून उत्तर येत नाही याचा अर्थ त्यांनाच महायुतीत ठेवायचं नाही, असे बच्चू कडू म्हणाले. आघाडी आणि महायुती या दोघांचे लक्ष मुख्यमंत्री खुर्चीवर आहे, असा टोलाही यावेळी त्यांनी लगावला.

मनोज जरांगेंच्या मागण्यावर काय म्हणाले ?

ओबीसीमधील काही जाती आता फक्त १९ किंवा २० टक्के आहेत. बाकी विजे एन टी मध्ये आहेत. मराठ गृहीत म्हणून गेलो तर मोठ्या प्रमाणत संख्या आहे. केंद्रावर ओबीसीला २७ टक्के देण्याचा प्रयत्न झाला तो प्रत्येक राज्यात सम समान असू शकत नाही. केंद्राने व्यवस्थित प्रयत्न केला तर चांगला फायदा होऊ शकतो. ओबीसीला ओपन मधले १० टक्के वाढवून घेतले, मराठ्यांचे ही नुकसान होणार नाही आणि ओबीसी यांचे पण नुकसान होणार नाही, असे बच्चू कडू यांनी सांगितले.

पुर्णा नगर, अचलपुरात गणपती मिरवणुकीवर दगडफेक

पोलीस तसेच शांतता समितीचे कार्यकर्ते किरकोळ जखमी

विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अचलपुर

अनंत चतुर्थीच्या दिवशी शहरातील सरमसपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गांधीपुल भागात शुललक कारणावरून तणाव निर्माण होत दोनशेच्या जवळपास जमावाने पोलीस व गणपती मंडळावर दगडफेक करण्यात आली यात एक पोलीस कर्मचारी व काही गणपती मंडळाचे सदस्य जखमी झाले असून पोलिसांनी तात्काळ दाखवलेल्या समय सुचकते मुळे मोठा अर्थ टळला असून जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद हे अवघ्या दहा मिनिटात घटनास्थळ दाखल होत परिस्थिती नियंत्रणात आणली .

प्राप्त माहितीनुसार सरमसपुरा पोलीसात दाखल तक्रारी नुसार मंगळवारी दि.१७/०९/२०२४ रोजी फिर्यादी नामे दीपेश विलास केचे वय १७ वर्ष रा.अब्बासपुरा,अचलपूर हा रात्री १०:३० च्या दरम्यान गणपती मंडळातून जेवण करून त्याचे मित्रासोबत घरी परत जात असताना गांधीपूल जवळ आरोपी नामे मोहित खान,अज्जू ,अप्पू, जावेद, अनवर व इतर १०-१५ इसमांनी त्यास अडवून स्वागत कमानीचे बैनर का फाडले या कारणावरून मारहाण करून त्याचे जवळील मोबाईल व नगदी १५००/- रुपये जबरीने हिसकावून घेतले . त्यानंतर नमूद आरोपी यांनी दीपेश यास गांधी पुलावरील पोलीस चौकीत नेले. त्यावेळी पोलिसांनी नमूद आरोपी यांना कायदेशीर कारवाई करीता तक्रार देण्यास सांगितले असता आरोपी ना पोलिसां सोबत वाद घातला व पोलिसांवर दगडफेक केली. त्यात दगड लागून तिथे कर्तव्यावर असलेले पो. हवा. सय्यद मकसूद रहमान व एक महिला पोलीस अमलदार जखमी झाल्या. त्यानंतर सर्व आरोपी निघून गेलेत. सदर घटनेमुळे गांधी पुलावर काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी गांधीपुलावर कोणतीही विसर्जन मिरवणूक चालू नव्हती.

वरील घटनेचे अनुषंगाने पोलीस स्टेशन सरमसपुरा येथे दीपेश केचे यांच्या तक्रारी वरून गैरकायदेशीर जमावाने मारहाण करुन पैसे व मोबाईल नेल्याने तर पो. हवा. सय्यद मकसुद यांच्या तक्रारी वरून अनधीकृत जमाव जमवून दगडफेक करून त्यात पोलिसांना जखमी करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्या बाबत १५-२० इसमानविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.घटनेचे गांभीर्य पाहता ,विशाल आनंद,पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण व शुभम कुमार, सहाय्यक पोलीस अधीक्षक, तथा उपविभागीय पोलिस अधिकारी उपविभागीय, अचलपूर आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन पाहणी केली. झालेली घटना अत्यंत गांभीर्याने घेऊन त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त नेमण्यात आला. तसेच पोलिसांकडून यातील आरोपींचा शोध रात्रीपासूनच युद्धपातळीवर चालू आहे.सरमसपुरा पोलीस स्टेशन हद्दीत आज दि. १८-०९-२४ रोजी श्री गणेश विसर्जन मिरवणुक असल्याने व आज सुद्धा पो. स्टे. सरमसपूरा, अचलपूर, परतवाडा हद्दीत SRPF , RCP, QRT पथकासह मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पोलीस मनुष्यबळ नेमण्यात आलेले आहे. परिसरात सध्या शांतता असून परिस्थिती नियंत्रणात आहे.दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ खा. डॉ. अनिल बोंडे यांनी आज ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात जाऊन गुन्हेगारांना तातडीने अटक करा अन्यथा गणपती विसर्जनाच्या मिरवणुका आम्ही आमच्या पद्धतीने करू

कृपया नागरिकांनी प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष अथवा सोशल मीडियावर प्राप्त कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये अथवा त्यावर कोणतीही प्रतिक्रिया देऊ नये. सरमसपुरा, अचलपूर परतवाडा परिसर व संपूर्ण जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आणि आज त्या परिसरात होणाऱ्या गणपती विसर्जन मिरवणुकी शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता पोलिस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व नागरिकांना करण्यात येत आहे...

विशाल आनंद,
(भा. पो. से.)
पोलिस अधिक्षक,
अमरावती ग्रामीण.

खा.डॉ.अनिल बोंडे यांना तातडीने अटक करून राज्यसभा सदस्य पद रद्द करा : किशोर बोरकर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८अमरावती

मस्तवाल आमदार संजय गायकवाड यांच्या नंतर अमरावतीचे डॉ.अनिल बोंडे यांनी सुध्दा देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे बाबत, आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल, डॉ.अनिल बोंडे,यांचा तिव्र निषेध महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केला असुन डॉ.अनिल बोंडे हे पेशाने डॉक्टर असतांनाही लक्षवेधक आणि सामाजिक सलोखा बिघडेल असं वक्तव्य केवळ भाजपाच्या वरीष्ठांना खुश करण्यासाठी सतत करीत असतात, आणि काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचेवर काहीतर चुकीचे करावे,व मग आपण पोलिस सुरक्षा मागावी,असा कुटील हेतु डॉ अनिल बोंडेचा असल्यामुळे पोलीसांनी अजिबात डॉ.अनिल बोंडेना पोलिस सुरक्षा देण्यात येवू नये,अशी मागणी किशोर बोरकर यांनी केली असुन ते पुढे म्हणाले की, देशाच्या संविधानातील तरतुदीनुसार निवडुन आलेला किंवा राज्यपाल, राष्ट्रपती द्वारे नियुक्त झालेल्या लोकप्रतिनिधीला सभापती संविधानाल अनुसरून शपथ देतात, देशाच्या संविधानाला अभिप्रेत कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करणार नाहीत, डॉ.बोंडेने संविधानाच्या शपथेचा भंग केल्याबद्दल त्यांना सभापतीनी राज्यसभेतील त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.यासाठी पोलिस आयुक्त अमरावती यांनी तसा अहवाल लोकसभेच्या सभापतींना सादर करून शहरातील कायदा सुव्यवस्थेचे संरक्षण करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केली आहे.



अनिल बोंडे यांच्या अमरावतीच्या घरासमोर युवक काँग्रेसचे आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१८ अमरावती

भाजपाचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्या चा निषेध करीत कारवाई करण्याची जोरदार मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. बोंडे यांच्या विधानाची दखल घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे तर दुसरीकडे युवक काँग्रेस चे पदाधिकारी आक्रमक होत

भाजप खासदार अनिल बोंडे यांच्या घरासमोर एकत्र येत जोरदार नारेबाजी करीत अनिल बोंडे यांच्या पोस्टरला जोडे मारलेअनिल बोंडे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत निषेध आंदोलन केले. त्यामुळे आता भाजप विरुद्ध काँग्रेस हा वाद अमरावतीत कोणत्या स्तराला जातो या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.